म. ग्रं. सं. ठाणे

विषय

संग्रहालय क्रमांक

लेखक


पुस्तकाचें नांव

सन

८२

सं. विदुरनीति व नारदनीति

आवृत्ति.


BEST TURKEY RED
Wm STIRLING & SONS.
YDS

# VIDURNEETI AND NARADNEETI.

# विदुरनीति व नारदनीति.

श्रीमद्भारतांत उद्योग व सभापर्वी

श्री वेदव्यासांनीं

संक्षेपें वर्णिली,

त्यांतील

आशय घेऊन

महाराष्ट्र भाषेंत हल्लीं जें बुक प्रसिद्ध तें


मुंबईंत गणपतकृष्णाजी यांचे

छापखान्यांत छापिलें.

आवृत्ति ३

शके १७८० सन १८५८.



सं.पौ. २०३

श्री

# विदुरनीति.

## प्रारंभः

कोणी एके समयीं, संजय धृतराष्ट्र राजाजवळ येऊन कौरवांची निंदा करून बोलिला कीं, मी उद्यां राजसभेस येऊन चार भीष्म द्रोणादिक शिष्ट बसले असतील, तेथें पांडव यांचा निरोप सांगणार आहें; मग काय घडेल तें घडो. असें वचन बोलोन तो आपले घरीं गेला असतां, परम शाहणा, धार्मिक, निस्पृह, ज्याचे बोलण्यानें ऐकणाराचें समाधानच व्हावें असा जो विदुर, त्यास बोलावून आणून राजानें तें सर्व वर्त-

श्रान सांगीतलें; आणि बोलतो. हे विदुरा ? संजय उद्यां येऊन सभेमध्यें पांडवांकडील निरोप बोलणार आहे, तें भाषण आमचे निंदेचेंच करील यांत संशय नाहीं; व त्यापासून काय अनर्थ होईल तो कळत नाहीं; यास्तव संजय येऊन गेल्यापासून मला बहुत चिंता श्राम जाहली आहे; निद्रा येत नाहीं; गात्रें विकळ होतात; यासमयीं तुला बरें जें दिसेल, जेणेंकरून माझा संताप दूर होईल, तें मला सांग. आमचे वंशांत तुजहून सुज्ञ थोर दुसरा नाहीं. असें धृतराष्ट्राचें वाक्य ऐकून विदुर बोलतो हे राजा ? संजय परमधार्मिक, विवेकी, चतुर आहे; तो बहुतकरून अन्यथा बोलणार नाहीं. तर तुह्मापासूनच कांहीं अपराध घडला नाहीं कीं ? निद्रा लागत नाहीं ह्मणतोस तर निद्रा चवघांस लागत नाहीं. जो बळ आणि सहाय नसतां बळवंताशीं वैर लावितो तो १. ज्याचें द्रव्य हरण जाहलें तो २. जो कामाचे स्वाधीन जाहला तो ३. व चोर ४. यां चवघांस रात्रंदिवस नीज नाहीं, यांतून एखादा दोष तूह्मांपासून घडला नाहींना ? शाहाणा जो आहे त्यापासून

ग्रं.पो.२०३



हे दोष घडत नाहींत; तर शाहाणा कोण व मूर्ख कोण यांचीं लक्षणें सांगतों.

जो चांगलीं कर्मे करितो, वाईट टाकितो, नास्तिकपणा धरीतनाहीं, शास्त्रावर विश्वास ठेवितो, तो शाहाणा ह्मणावा. क्रोध, हर्ष, गर्व, लाज, ताठा, मानीपणा हीं सोडितो; ज्याची गुह्यगोष्ट कोणास समजत नाहीं; जें करणार तें सिद्धीस गेल्यावर लोकांस समजतें; शीत, उष्ण, भय, प्रीति, मातबरी, गरीबी, यांपासून जो आपल्या कार्यास विघ्न होऊं देत नाहीं; उचितकर्मे करून हळुहळु एथील विषयभोग सोडून आपलें चित्त मोक्षमार्गीं लावितो; आपली योग्यता पाहून इच्छा करितो; शक्तीप्रमाणें एखादे कामास हात घालितो; कोणाचा अवमान करीत नाहीं; सांगीतली गोष्ट लवकर समजतो, जेथें भ्रांती येईल तेथें समाधान करून घेतां कंटाळत नाहीं; सारवस्तूची इच्छा करितो; प्रार्थिल्या वांचून दुसऱ्याचे गोष्टींत मन घालित नाहीं; आपणास न मिळणाऱ्या वस्तूंची इच्छा करीत नाहीं, गेलेले वस्तूचा शोक धरीत नाहीं; मोठे संकटीं-

ही ज्याची बुद्धि चळत नाहीं; जो पक्का विचार करून कामास हात घालितो; आरंभिलेलें काम शेवटास नेतो; रिकामा काळ जाऊं देत नाहीं; मन स्वाधीन करितो; थोरांचीं कर्में पाहून संतोष मानितो; हित सांगीतलें ऐकतो; आपले स्तुतीनें ज्यास आनंद होत नाहीं. अपमानानें खेद होत नाहीं; जो गंगेच्या डोहासारिखें चित्त स्थिर ठेवितो; सर्व वस्तु नाशवंत असें जाणतो; सर्व कर्मांची योजना जाणतो; प्रयत्न करूं जाणतो; भाषण करितां संशययुक्त होऊन अडखळत नाहीं; बोलण्यांत अनेकरस आणावयास जाणतो; तार्किक जाणतो; ज्यास समयीं सुचतें; जो गोष्टीचा सारांश लवकर बोलायास जाणतो, ज्याचे बोलण्यास आणि शास्त्रास पडतें; जो थोरांची मर्यादा उल्लंघीत नाहीं; बहुत द्रव्य आहे, विद्या येत आहे, ऐश्वर्य आहे, ह्मणून उद्धट होत नाहीं; अशा पुरुषाचेठायीं शाहाणपण नित्य राहतें असें जाणावें.

जो कांहीं पढला नाहीं, ज्यास अहंकार फार, जो दरिद्री कुकर्मानें द्रव्य इच्छितो, तो मूर्ख जाणावा. जो

औ. ३ सं. पौ २०३



आपलें असतें द्रव्य उधळितो; दुसऱ्याचें घ्यायास इच्छितो; सन्मित्राशीं कृत्रिम करितो; ज्याची इच्छा करूनये तें इच्छितो; इच्छायाचें इच्छित नाहीं; ज्याची सगतकंरूनंये त्याची करितो; मित्राचा स्नेह तोडितो; आपलें केलेलें ज्यास त्यास सांगत फिरतो; दुसऱ्याची कोणतीही गोष्ट ज्यास खरी वाटत नाहीं; लवकर होणार त्या कामास उगीच उशीर लावितो; वडिलांचें श्राद्ध, देवपूजा करीत नाहीं; जिवलगमित्र करण्याविषयीं ज्यास कोणीही योग्य दिसत नाहीं; तो मूर्ख यांत भ्रांति नाहीं. जो बोलाविल्यावांचून जातो; पुसल्यावांचून बोलतो; ठेवूंनये तेथें विश्वास ठेवितो; ज्याचें चित्त सदा स्थिर नाहीं जो दोष दुसऱ्यास ठेवितो तोच आपण आचरितो; निष्फळ क्रोध करितो; आपलें सामर्थ्य जाणत नाहीं स्वधर्म, स्वार्थ ज्यास समजत नाहीं; मिळावयाची नव्हे ती वस्तू कांहीं उद्योग नकरून इच्छितो; जेथून लाभ होऊंनये तेथून लाभ इच्छितो; कृपणाचा आश्रय करितो; तो संपूर्ण मुर्ख ह्मणावा. आपली संपत्ति, वस्त्रें, भूषणें, आपण एकटाच भोगितो;

आपले आश्रितांविषयीं जो बहुत कृपण; अथवा जो पाप करून द्रव्यादिक मिळवितो, त्याचा उपभोग दुसरे घेतात तो पापास मात्र अधिकारी, असा जो त्याहून दुसरा मूर्ख नाहीं.

एका बुद्धीनें करणें नकरणे यां दोहोंचा विचार करावा. सलूख १. लांच २. फितुर ३. युद्ध ४. या चोहोंनी, शत्रु १. मित्र २. उदासीन ३. हे तिघे आपलेसे करावे. शब्द १. स्पर्श २. रूप ३. रस ४. गंध ५. हे पांच विषय घेणारीं पांच इंद्रियें जिंकोन, काम १. क्रोध २. लोभ ३. मोह ४. मद ५. मत्सर ६. या साहांस शत्रु असे ओळखावे. स्त्री १. द्यूत २. जीवहिंसा ३. मद्यपान ४. कठोरभाषण ५. लाहान अन्यायास मोठें शासन करणें ६. दुसऱ्याची गोष्ट खोडणें ७. हीं सात व्यसनें सोडून सुखी व्हावें. विष एकास मारितें; शस्त्र एकाचा जीव घेतें; परंतु राजाची गुह्यगोष्ट फुटली असतां राजा, प्रजा, यांसुद्धां राज्याचा नाश होतो ह्मणून राजाची गुह्यगोष्ट बोलूं नये. एकट्यानें गोडगोड खाऊं नये. एकट्यानें सर्व द्रव्य घ्यायाची इच्छा

स.पो. २०७



करूं नये. एकट्यानें दूर वाट चालूं नये. बहुत निजले असतां एकानें जागत बसूंनये. ज्यास दुसरी उपमा नाहीं, ज्याचा महिमा बहुत गहन, जें स्वर्गाचे मार्गाची पायरी, जसी समुद्र तरायास नौका असें जें सत्य त्यास कदापि सोडूंनये. क्षमावान् पुरुषास लोक निर्बळ ह्मणतात हा एकच दोष, तो तर दयेस्तव कोणास उपद्रव करीत नाहीं, ह्मणून त्यामध्यें हा दुर्गुण असें ह्मणूनये. क्षमे सारिखें दुसरें बळ नाहीं. अशक्तास क्षमा हा गुण होय. सामर्थ्यवानास क्षमा हें भूषण होय. क्षमेनें सर्व वश होतात. क्षमेनें सर्व मिळतें. क्षमारूप तरवार हातीं असल्यावर दुर्जन काय करील ? ज्यास क्षमा नाहीं तो फार क्रूरकर्मे करून पापांत पडतो, धर्माहून दुसरें पुण्य नाहीं. क्षमेहून दुसरें समाधान नाहीं. विद्येहून दुसरी तृप्ती नाहीं. कोणाचाही घात नकरणें त्यासारिखें दुसरें सुख नाहीं.

दोघे पुरुष यालोकीं शोभतात. जो मृदु बोलतो तो १, आणि साधूचें पूजन करितो तो २, दोन दुसऱ्यास विश्वास उत्पन्न करितात. एका स्त्रीनें जी वस्तू

मिळविली ती पाहून दुसरीही तशीच इच्छिते १, एकाचें एकानें पूजन केलें पाहून दुसराही त्यालाच पूजितो २. दोघे आपलें शरीर आपण शोषिताहेत. थोडें मिळत नसतां मोठा लाभ इच्छितो तो १, द्रव्य मिळावायाचें सामर्थ्य नसतां मिळत नाहीं ह्मणून रागास भरतो तो २. न करायाचें कर्म केल्यावर बहुत करून हे दोघे शोभत नाहींत. घरबारी असून संसाराचा उद्योग सर्व सोडितो तो तो १, आणि संन्यासी असून गृहस्थाचीं कर्में करितो तो २. हे दोघे स्वर्गीं राहतात. दरिद्री असून दाता १, आणि राजा असून कृपाळु २. सत्कर्मानें मिळविलें जें द्रव्य त्याच्या ह्या दोन अमर्यादा होत. कुपात्रीं देणें १, सत्पात्रीं नदेणें २. दोघांस गळ्यामध्यें दगड बांधून पाण्यांत बुडवावें. जो द्रव्यवान् असून धर्म करीत नाहीं तो १, दरिद्री असून ईश्वराकडे चित्त लावीत नाहीं तो २. या लोकीं मनुष्यास उपाय तीन; युद्ध करणें हा शेवटला १, लांच, फितुर करणें, हा मध्यम २, सलूखीनें चालणें हा उत्तम ३. तीन प्रकारचे पुरुष तीन कर्मांस यो-

 स-पी-२०३

जावे. चांगला पुरुष चांगल्या कर्मास १, सामान्य पुरुष सामान्य कर्मास २, नीच पुरुष उण्या कर्मास ३. स्त्री १, पुत्र २, आणि गुलाम ३, हे तिघेही निर्धन ह्मणावे; कां जर हे ज्याचे ह्मणवितात तो यांणीं मेळविले द्रव्याचा धनी होय. दुसऱ्याचें द्रव्य हिरून घेणें १, दुसऱ्याचे स्त्रीस शिवणें २, इष्टमित्रांस सोडणें ३, हें तीन दोष आपल्या नाशाचें कारण होत. काम १, क्रोध २, लोभ ३, हे तीन अनर्थांत टाकणारे ह्मणून तिन्हीं सोडावे. देवापासून वर मिळाला तो लाभ १, राज्यलाभ २, पुत्रलाभ ३, यां तीहीं पेक्षां शत्रूला संकटापासून सोडवावा हें अधिक. या तिघांस कदापि अंतर देऊंनये; ज्याला आपला असें ह्मटलें १, जो आपली सेवा करितो २, जो आपणास शरण आला ३.

या चवघां बरोबर राजानें मसलत करूंनये मूर्ख १, चेंगट २, आळसी ३, आणि खुशामती ४. हे चौघे आपल्या घरांत बाळगायासयोग्य होत; आपल्या जातीचा ह्मातारा १, कुलीन २, गरीबसखा ३, आणि जिला लेंकरूं नाहीं ती बहीण ४, ही चार सध्या फळ

देणारीं होत; देवांहीं इच्छिली गोष्ट १, तपस्वी याचें वाक्य २, विद्या असून नम्रता ३, आणि पाप कर्म ४. हे पांच अग्नी असें समजोन भजावे; बाप १, आई २, विवाहांत होम केला तो अग्नि ३, देह ४, गुरु ५. देव १, पितर २, सुमनुष्य ३, संन्याशी ४, अतिथि ५, या पांचांतें पुजिल्यावर यश पावतो. मित्र १, शत्रु २, मध्यस्थी करणारा ३, वडील ४, आश्रित ५, हे पांच जेथें जेथें राजा जातो तेथें तेथें मागून जातात. श्रोत्र १, त्वचा २, चक्षु ३, जिव्हा ४, घ्राण ५, या पांचा इंद्रियांतून एकादें नाश पावलें असतां तितकी बुद्धि हळुहळु उणी होते; जसें पाण्याचे पखालीस भोंक पडतें आणि त्यांतून पाणी हळुहळु निघोन जातें, ह्मणून इंद्रियें राखावीं. हे सहा दोष संपत्ति मिळवणारानें सोडावे; नीज १, निद्रेसंबंधीआळस २, भय ३, द्वेष ४, सर्वदा आळसीपणा ५, धिमेपणा ६. चांगलें बोलतां येत नाहीं असा उपाध्या १, विद्या पढला नाहीं असा ऋत्विज २, लोकांचें रक्षण करीत नाहीं असा राजा ३, गोड बोलावयास येत नाहीं अशी भार्या ४, गावांत राहणारा

स॰ पो॰ 203



गवळी ५, वनांत राहणारा न्हावी ६, हे सहा फुटके नावेचे परी सोडावे. सत्य १, धर्म करणें २, आळस नकरणें ३, दुसऱ्याचे गुणाला दोष नलावणें ४, क्षमा ५, धैर्य ६, हे सहा गुण पुरुषानें कदापि सोडूंनयेत. द्रव्य १, निरोगीपणा २, आवडती बायको ३, हितकर्ते बायको ४, अनकूळ पुत्र ५, द्रव्यादिक मिळवणार अशी विद्या ६, हीं सहा येथें सुख देणारीं होत. काम१, क्रोध २, लोभ ३, मोह ४, मद ५, मत्सर ६, हे सहा आंतले शत्रु जो जिंकितो, त्यास पाप किंवा कांहीं एक अनर्थ बाधत नाहीं. हे सहा सहाजणापासून सुखी होताहेत; असावधापासून चोर १, रोग्यापासून वैद्य २, विषयी पुरुषापासून शिनळबायको ३, यजमानापासून आश्रित ४; शत्रूस जिंकून राजा ५, राजाच्या योगेंकरून पंडित ६. गाई १, चाकरी २, शेतकी ३, बायको ४, विद्या ५, अनाड्याची संगती ६, हीं सहा एक घटिका विसंबिलीं असतां बिघडतात. हे सहा आपलें आपलें काम जाहाल्यावर पूर्वील उपकार करणारांस विसरतात. शिकलेला शिष्य गुरुस

विसरतो १, बाईल जाहाल्यावर पुत्र आईस २, संभोग जाहल्या नंतर भर्ता स्त्रीस ३, ज्याचें काम जाहालें तो काम करणारास ४, नदी उतरोन गेल्यावर उतारू नावाड्यास ५, बरा जाहाल्यावर रोगी वैद्यास विसरतो ६. निरोगी शरीर १, ऋण नसणें २, प्रवास नसणें ३, साधूशीं संगत असणें ४, अन्न वस्त्र असणें ५, निर्भय जागीं राहणें ६, हीं सहा मृत्युलोकींचीं सुखें होत. सोसिक नव्हे तो १, दयाळु २, असंतोषी ३, क्रोधी ४, नित्य ज्याच्या चित्तांत शंका तो ५, दुसऱ्याच्या भाग्यावर पोटभरणारा तो ६, हे सहा नित्य दुःखी जाणावे.

स्त्रियांचा छंद १, द्यूत २, पारध ३, पद्यपान ४, कठीणभाषण ५, लहान अन्यायास मोठी शिक्षा ६, अन्यायानें द्रव्य मिळवणें ७; हे सात दुर्गुण राजानें टाकावे. हीं आठ केवळ सुखाचीं सारें होत; मित्राची संगत १, पुष्कळ द्रव्यप्राप्ती २, पोटीं सुपुत्र ३, पाहिजे तशी बायको ४, प्रसंगीं गोष्ट सुचणें ५, आपल्या कुळामध्यें कुळदीपक असणें ६, इच्छिली वस्तु प्राप्त होणें ७, सभेमध्यें सन्मान होणें ८, हे आठ गुण पुरुषातें

शोभेस आणितात. सुबुद्धि १, सुकुळांत जन्म २, मन स्वाधीन ३, शास्त्राध्ययन ४, पराक्रम ५, बोलकेपणा ६, आपल्या सामर्थ्याप्रमाणें दान करणें ७, दुसऱ्यानें केलेले उपकार आठवणें ८. शरीर हेंच कोणी एक घर जाणावें; ज्यास डोळ्याचीं भोकें २, नाकाचीं २, कानाचीं २, तोंडाचें १, मळद्वार १, मूत्रद्वार १, अशीं यऊ द्वारें आहेत. सत्त्व १, रज २, तम ३, हे तीन खांब, यांचे साक्षी पांच, पृथ्वी १, आप २, तेज ३, वायु ४, आकाश हे ५, आणि या शरीराचा धनी जीवात्मा आंत राहाणारा असें जाणतो तो शाहाणा जाणावा. हे दाहा जण आपलें बरें किंवा वाईट समजत नाहींत, मद्यपी १, विषयासक्त २, उन्मत्त ३, थकलेला ४, कोपिष्ठ ५, भुकेलेला ६, उतावळा ७, लोभी ८, भ्याड ९, कामातुर १०. जो काम क्रोध सोडितो; सत्पात्र पाहून कांहीं देणें तें देतो; उत्तम, मध्यम, कनिष्ठ, कोणतें हें तारतम्य जाणतो; शास्त्र जाणतो; लवकर युक्तीनें कार्य करूं जाणतो; अशा पुरुषास सर्व लोक वंदितात. लोकांहीं विश्वास धरावा असेंच जो आचरण

करितो; पक्का अपराधी ठरल्यावांचून दंड करीत नाहीं; दंड करणें तो अपराधासारिखा करितो; क्षमेस योग्य त्या अपराध्याची क्षमाच करितो; अशा पुरुषातें लक्ष्मी स्वयें वरिते. दुर्बळाची अवज्ञा करीत नाहीं; सामग्री सिद्धकरून शत्रूवर जातो; बळवंताशीं वैर करीत नाहीं; आपला चढता काळ पाहून युद्धास उभा राहातो तो धीर जाणावा. विपत्तिकाळींही स्वस्थ राहून उद्योग करीत असतो; समर्यी दुःखही साहातो; असा जो त्याणें शत्रु जिंकिले असेंच ह्मणावें. यालोकीं तो एक सुखी, जो व्यर्थ प्रवास करीत नाहीं; पातक्याची सोबत करीत नाहीं; परस्त्रीस स्पर्श करीत नाहीं; थोड्यासाठीं वाद करीत नाहीं; दुसऱ्यानें सत्कार न केला तरी रागें भरत नाहीं आपणास जें जें उचित तें तें कंटाळोन करीत नाहीं; बोलविला असतां सत्य तेंच बोलतो; ढोंग, चोरी चाहाडी, मद्यपान हीं करीत नाहीं.

जो पुरुष दुसऱ्याची अदेखाई करीत नाहीं; कोणाचीही ज्यास दया येते; आपण दुर्बळ असोन स-

मर्थाचा आव घालीत नाहीं; कोणीही वाईट बोलला तथापि साहतो; असा पुरुष प्रशंसेस योग्य होतो. जो उद्धटपणा करीत नाहीं; आपला थोरपणा पुढें करून दुसऱ्याचा तिरस्कार करीत नाहीं; कोणास कठीण बोलत नाहीं; अशा पुरुषाचें सर्व लोक हितच करिताहेत.

जो मागें पडलेलें वैर पुनः उत्पन्न करीत नाहीं; गर्वाचे स्वाधीन होत नाहीं; दुर्बळ असतांही कुकर्म करीत नाहीं; अशा पुरुषास शिष्टही मान देताहेत. आपणास सुख जाहालें ह्मणून हर्ष मानीत नाहीं; दुसऱ्याचे दुःखानें ज्याचें चित्त कळवळतें; एक वेळ दुसऱ्यास वस्तु दिल्यावर मग तिचा खेद करीत नाहीं; अशास सत्पुरुष असें ह्मणावें. जो देशाचार, देशभाषा, जातिधर्म जाणूं इच्छितो; जो उत्तम कोण अधम कोण यांचा विचार ठवितो; असा जो तो जेथें जेथें जातो तेथें तेथें सर्वांचा धनी होतो. दंभ, मोह, मत्सर, पापकर्म, राजद्वेष, चाहाडी, बहुतांशीं वैर, मद्यपी व उन्मत्त अथवा दुर्जन यांशीं वाद, हीं जो सोडितो तो

प्रधानाचे पदवीस योग्य होतो. दान, होम, कुळदैवत पूजन, शुभकर्मे, प्रायश्चित्तें, हीं नित्य करितो त्यास देवही मानितात. समानाशीं वाद करितो नीचाशीं करीत नाहीं; गुणवान् पुरुषाचा बहुमान करितो; अशा पुरुषास थोरही मानिताहेत. आपल्या आश्रितांचा समाचार घेऊन स्वयें परिमित भक्षितो; अपरिमित कर्म करितो; परिमित निजतो; शत्रूहीं जरी याचना केली तथापि त्यांस देतो, त्या पुरुषास अनर्थ कधींही प्राप्त होत नाहीं.

ज्याचे मनांतील बरी किंवा वाईट गोष्ट इतर लोक जाणत नाहींत; जो आपला मनसुबा फार गूढ राखायास जाणतो, ह्मणून त्याचें कोणतेंही काम कधींच बिघडत नाहीं; जो सर्व भूतांचें कल्याण करायास उद्योग करितो; जो सत्य आणि मृदु भाषण करितो; दुसऱ्याचा मान राखितो, ज्याचें मन सरळ; तो जातीमध्यें फार शोभतो, जसा उत्तम खाणीचा हिरा. आपल्या हातानें कधीं एखादें वाईट कर्म घडलें तें दुसऱ्यास न समजलें तरीं आपणच लाजतो तो सर्व लो-

कांमध्यें श्रेष्ठ होतो; कां जर अशा पुरुषापासून पुनः वाईट कर्म कधींही घडत नाहीं. जो मतापी असून समाधानवृत्ति आणि निर्मळचित्त तो लोकांमध्यें सूर्यासारिखा शोभतो; असे शाहाण्याचे धर्म आहेत, याकरितां शापदग्ध जो पंडुराजा त्याचे पुत्र पांच ते पांचही इंद्रासारिखे पराक्रमी, त्यांस बाळपणापासून वाढविलेंस व शिकविलेंस, तुझी आज्ञा ते मानितात, तस्मात् त्यांचा राज्यभाग त्यांस दे आणि पुत्रांसहित सुखी राहा ह्मणजे देव किंवा मनुष्य मला काय ह्मणतील अशी शंका तुला होणार नाहीं.

---

# विदुरनीति.

## अध्याय दुसरा.

धृतराष्ट्र बोलतो, हे विदुरा ! मूळापासून पांडवांचे अपराधच करीत आलों आह्मीं, त्याचें फळ आह्मास प्राप्त होईल, हें त्वां नीति उपदेशिली त्यावरून मला उघड दिसून आलें; तेणेंकरून मी फार भयभीत आहें; तर अशासमयीं तूं धर्मराजाचे मनांतील अभिप्राय घेऊन जेणेंकरून पांडवांचें व आमचें कल्याण होईल तो उपाय सांग. असा धृतराष्ट्राचा बोल ऐकून विदुर ह्मणतो, यद्यपि आपले मनांत आहे कीं, एकाद्याचें कल्याण व्हावें तथापि त्याणें पुसल्यावांचून त्याचें पाप किंवा पुण्य, हित किंवा अनहित कांहींच बोलूं नये. आतां तूं पुसिलेंस ह्मणून मला बरें दिसत त आहे तें सांगतों, श्रवण कर.

जीं जीं कर्में खोटे उपायांनीं साध्य केलीं, त्यां-

चा परिणाम वाईट हा निश्चय मानून अशा कर्माकडे अतःपर चित्त घालूं नको. तूं ह्मणशील कीं, खोटे उपाय सोडून सरळ मार्गानें जीं कर्में केलीं त्यां सर्वांचा शेवट बराच होतो हा तरी नेम कोठें आहे? तर ऐक कीं, असा विपर्यास जेथें पडतो तेथें सुज्ञ आहे तो ईश्वरी इच्छा असें जाणून त्याचा खेद करीत नाहीं, ज्या कामास जें साहित्य पाहिजे त्याची पूर्वींच योजना करावी, उतावळीनें हात घालूं नये, काम जें करायाचें त्यास साहित्य किती पाहिजे तें पहावें, आरंभिलें कर्म शेवटास पाववील असा आपला उद्योग आहे कीं नाहीं, हा सर्व विचार करून शेवटास जाईल असें असेल तेंच करावें.

जो राजा आपले किल्याची बळकटी जाणत नाहीं; तसेंच आपला काळ अनकूळ आहे कीं नाहीं; द्रव्य भरपूर आहे कीं नाहीं; देश सुभिक्ष आहे कीं नाहीं; सेना आपली बळकट आहे कीं नाहीं; हें सर्व जो जाणत नाहीं, तो राजा फार दिवस राज्य करीत नाहीं, आणि जो राजा हें सर्व जाणून उचित तेंच

आचरितो, त्याचे राज्यास कधींही भंग नाहीं. राज्याधिकार प्राप्त जाहाला ह्मणून नम्रता धरीत नाहीं, त्या राजाची संपत्ति लवकर लयास जाते. ज्याणें इंद्रियें स्वाधीन न ठेविलीं त्याचें तारुण्य जसें लवकर लयास जातें; जसा मासा गळास डशिवलेलें मांस पाहून खावयास जातो, परंतु त्या मांसाचे आंत लोखंडाचा कांटा आहे तो आपले गळयास रुपोन प्राण घेईल हें पाहात नाहीं; तसें विचारवंत पुरुषांनीं करूं नये. जो पदार्थ आपल्यास खावयास योग्य आहे, खाऊन जिरविण्याविषयीं आपले अंगीं शक्ति आहे, जो जिरला असतां सामर्थ्य देईल, असा असेल तोच भक्षावा. जो वृक्षाचें हिरवें फळ तोडितो, त्यास त्या फळाची गोडी सांपडत नाहीं, आणि त्यांतील बींही उपयोगास पडत नाहीं जो पिकलें फळ काढितो तो त्या फळापासून रस घेऊन त्यांतील बीजापासूनही दुसरीं फळें लाभतो; जसा भ्रमर फुलें राखोन फुलांतील मध मात्र घेतो; माळी जसा झाडापासून पुष्पें फळें घेतो मुळास दुखवित नाहीं, तसें राजानें प्रजांस दुखविल्यावांचून त्यां-

पासून थोडें थोडें युक्तीनें द्रव्य घेत असावें.

किती एक कामें अशीं असतात कीं उद्योग केल्यावांचून काळेंकरून आपले आपण साध्य होतात; तींच आज उद्योग केल्यानें साध्य होत नाहींत; तर हा विचार करून कर्तव्य तें करावें. जो राजा प्रसन्न जाहला असतां हित करूं शकत नाहीं, अथवा कोपला असतां उपद्रव करूं शकत नाहीं, अशा राजास प्रजा इच्छित नाहींत; नपुंसक पुरुषास जशा स्त्रिया इच्छित नाहींत. किती एक गोष्टी अशा असताहेत कीं थोडके आयासानें साध्य होऊन मोठें फळ देतात, तर अशांकडे शाहण्यानें चित्त ठेवीत जावें. प्रीतिपूर्वक सर्व प्रजेवर ज्या राजाची दृष्टी असते, त्या राजास प्रजाही प्रीतिपूर्वक पाहतात. जो शब्देंकरून व दृष्टीकरून सेवकांवर प्रीति मात्र दाखवितो परंतु त्यांचें हित करीत नाहीं तो १, प्रसन्न जो जाहाल्यावर सेवकांस द्रव्यादिक देतो परंतु ज्याची मरजी संपादणे फार कठीण तो २, आंत निर्बळ आहे परंतु बाहेर अवसान घालून बलाढ्य असें दाखवितो तो ३, यां तिघां-

पेक्षां जो दृष्टीनें, मनानें, शब्दानें, उदारपणानें सर्वांस प्रसन्न ठेवितो, त्या राजास सर्व लोक अनकूळ होताहेत. सावजें जशीं पारध्यापासून त्रास पावतात तसे सर्व लोक ज्या राजापासून भय पावतात त्या राजास दैवयोगानें समुद्रवलयांकित पृथ्वीचें राज्य साध्य झाहालें तथापि तो राज्यभ्रष्ट होईल. अनीतीनें जो राजा चालतो, त्याचें राज्य वडिलोपार्जित आहे तथापि जातें. राजाचे धर्माप्रमाणें जो राजा चालतो तो ऐश्वर्य वाढविणार, धनधान्येकरून युक्त अशे पृथ्वीचें राज्य करितो. अधर्माचें आचरण जो करितो त्या राजाला पाहून पृथ्वी आंखुडते; जसें अग्नीमध्यें चांबडें घातलें असतां वाळून आंखुडतें.

दुसऱ्याचें राज्य घ्यावयाकरितां जसा प्रयत्न करावा त्या तोलीचा उद्योग आपलें राज्य पाळावयाकरितां करावा. धर्मेंकरून ज्या राजास राज्य प्राप्त होतें तें नीतीनें पाळिलें असतां त्यापासून लक्ष्मी प्राप्त होते; ती त्यास सोडीत नाहीं हळुहळु वाढतच जाते. मस्त जें बकेल, किंवा बाळक जें बडबडेल, अथवा

जो कोणी कांहीं बोलेल, त्यांत सार गोष्ट असेल तितकी घेत जावी, मृत्तिकेपासून जसें सोनें घ्यावें. आई, बाप, गुरु, पंडित यांचे भाषणांतील चांगले चांगले गोष्टींचा संग्रह करीत असावा; रत्नपारखी जसा एकेक चांगलें चांगलें रत्न निवडून घेऊन संग्रह करीत असतो.

गार्यींस वासाचे योगानें दिसतें; ब्राह्मणास वेदद्वारें दिसतें; राजास सेवक समजावितील तसें दिसतें; वरकड लोकांस आपआपले डोळ्यांनीं दिसतें. जी गाय सुखानें दूध देत नाहीं ती फार क्लेश पावते, जिला दोहायास प्रयत्न लागत नाहीं ती क्लेश पावत नाहीं. जी वस्तु तापविल्यावांचून पाहिजे तशी लवते तिला कोणी तापवीत नाहीं. काष्ठ स्वयें नम्र असल्यास त्याला शेकोन लववीत नाहींत; ह्मणून तुह्मी पांडवांशीं नम्र असावें कां तर ते बळवान् आहेत.

पशूंस पर्जन्याचें बळ, राजास प्रधानांचें बळ, स्त्रियांस पतीचें बळ, ब्राह्मणांस वेदांचें बळ. सत्यानें धर्म राहतो, अभ्यासानें विद्या राहते, तेलउटन्यानें रूप राहतें, धर्माचरणानें कुळाचें रक्षण होतें, मोज माप

लक्षांत ठेविल्यानें धान्याचें रक्षण होतें, फेर फटक्यानें घोड्याचें रक्षण होतें, देखरेख ठेविल्यानें गायींचें रक्षण होतें, उणाख वस्त्र नेसविल्यानें स्त्रियांचे स्थितीचें रक्षण होतें. थोरकुळांत जन्मला आणि आचारहीन आहे तर तो थोर नव्हे. अंत्यजाचे कुळांत जन्मला, आणि आपल्या आचरणानें आहे त्यास थोर ह्मणावा. दुसऱ्याचें द्रव्य, रूप, पराक्रम, किंवा थोर कुळ, पाहून ज्याला बरें वाटत नाहीं त्याचें सुख किंवा संपत्ति त्यास नित्य रोगासारिखी जाच करिते, न करायाचें कर्म करायास भितो, करायाचें कर्म करायास भितो, केलेली मसलत पार पडायाचे अगोदर लोकांस कळेल ह्मणून भितो, असा सर्वत्रच भितो, त्या पुरुषानें जें करणें तें सांवधगिरीनें करावें.

विद्या १, धन २, आप्त जनांचें साहित्य ३, हीं तीन गर्विष्ठास प्राप्त जाहालीं असतां चढून जातो, परंतु हींच सज्जनास अनकूळ जाहालीं असतां तो अधिक नम्र होतो. कांहीं कार्यामुळें सज्जनानें दुर्जनाचा बहुमान केला असतां तो तितक्यानेंच आपण सज्जन

असें मानितो, आपला दुर्जनपणा सर्व लोकांस ठाऊक आहे हें त्याचे लक्ष्यांत राहत नाहीं. आत्मज्ञान्यांस साधु पुरुषांवांचून गति नाहीं, साधूसही साधूवांचून गति नाहीं, असाधूस तर साधूच गति, परंतु साधूस असाधूचा उपयोग नाहीं. चांगलें वस्त्र अंगावर घेणारानें सभा जिंकिली, दुभतें ज्याचे घरांत आहे त्याणें स्वादिष्ट खाण्याची अशा जिंकिली, वाहनावर बसून जाणारानें मार्ग जिंकिला, ज्याचा स्वभाव चांगला त्याणें सर्व जिंकिलें ह्मणून पुरुषास बरा स्वभाव असणे हें मुख्य होय; तो स्वभाव ज्यास नाहीं, त्यास धन असून बंधू असून, जीवित असून काय फळ, तीं सर्व व्यर्थ होत. राजादिक थोरांचे भोजनांत मांस मुख्य, मध्यम लोकांचे भोजनांत गोरस मुख्य, गरिबांचे भोजनांत तेल मुख्य. कसेंही अन्न असलें तरी गरिबांस गोड लागतें, कां तर त्यांस भूक स्वाद उत्पन्न करिते, तो स्वाद इतरांस नाहीं. बहुतकरून श्रीमंतांस भोजनाची शक्ति थोडीच असते. गरिबांनीं लांकडें खालीं तथापि पचताहेत. निकृष्टजन पोट कसें भरेल ह्मणून भिताः

हेत, मध्यम आहेत ते मरण येईल ह्मणून भिताहेत, उत्तम पुरुष अपमान होईल ह्मणून भिताहेत. सुरापानादिकेंकरून माजतो तो कांहीं घटिकांनीं सावध होतो, परंतु ऐश्वर्यमदानें जो मत्त जाहाला, तो दरिद्री जाहल्यावांचून सावध होत नाहीं; यास्तव ऐश्वर्य आलें असतां माजणें हें मोठें पापाचें फळ. ज्याणें इंद्रियें स्वाधीन राखिलीं नाहींत त्याचे आचरणानें सर्व लोकांस पीडा होते व त्यासही होते. शब्द विषय ह्मणजे मंजुळ शब्देंकरून मन हरण करितात अशा वस्तु, स्पर्श ह्मणजे अंगास लागून सुख देतात अशा वस्तु, रूप ह्मणजे सुंदरपणानें भुलवितात अशा वस्तु, रस ह्मणजे जिभेस स्वादिष्ट लागतात अशा वस्तु. गंध ह्मणजे सुवास देऊन संतुष्ट करितात अशा वस्तु, शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध, हे पांच विषय ह्मणावे; हे ज्याणें स्वाधीन ठेविले नाहींत त्या पुरुषाच्या विपत्ति वाढताहेत, शुक्ल पक्षीं जशा चंद्राच्या कळा. मन जिंकिल्यावांचून जो इंद्रियें जिंकायाची इच्छा करितो त्यास इंद्रियेंच काम क्रोध वैऱ्यांचे हातीं देताहेत. ह्म-

णून प्रथम मन जिकावें; मन व इंद्रियें जिकोन ज्याणें काम क्रोधादिक वश केले, जो कोणतीही गोष्ट पुनः पुनः विचार करून करितो, त्या पुरुषास लक्ष्मी स्वयें अनकूळ होते. पुरुषाचें शरीर हा कोणी एक रथ ह्मणावा, याचा सारथी मन होय इंद्रियें हे घोडे, ते घोडे जर स्वाधीन असतील तर जसा कोणी प्रत्यक्ष रथांत बसून सुख पावतो तसा याचाही आत्मा सुख पावेल.

जो उचित कर्में सोडून आपले इंद्रियांची इच्छा जशी असेल तसा वर्ततो तो वैभव, प्राण, धन, स्त्री, यांपासून लवकर भ्रष्ट होतो. जो विषयांचा धनी होतो, इंद्रियांचा धनी होत नाहीं, तो इंद्रियें स्वाधीन नाहींत ह्मणून धनीपणा पासून भ्रष्ट होतो. मन स्वाधीन असलें तर तें मन मित्ररूप होतें आणि स्वाधीन नसलें तर तेंच शत्रुरूप होतें. काम, क्रोध हे दोघे मुख्य शत्रु होत यांस फार जपावें जो आपले शरीरांतील शत्रु कामक्रोधादिक जिकिल्या वांचून बाहेरील शत्रूंस जिकायास इच्छितो, त्यास हे कामक्रोधा-

दिक शत्रु आंतून उलटून पाडिताहेत. इंद्रियें जिंकिल्यावांचून जे राजे राज्य करितात ते ऐश्वर्यमदेंकरून राज्यभ्रष्ट होतात; रावणादिकांहीं इंद्रियें जिंकिलीं नाहींत ह्मणून विव्हळ होऊन सीताहरणादिक कर्मे करून ऐश्वर्यासहवर्तमान प्राणास मुकले. पापकर्त्या पुरुषांचा त्याग न केला असतां, पुण्यवानास त्या पातक्यांच्या संगतीनें त्यांचें अर्धं पातक लागतें; जसें सुक्यां लांकडांच्या संगतीनें ओलींही जळतात, ह्मणून पातक्यांचा संसर्ग कदापि करूं नये.

दुष्टपुरुषाचे ठिकाणीं हे आठ गुण राहात नाहींत; दुसऱ्याचें बरें पाहून संतोष मानणें १, सरळपणा २, निर्मळता ३, संतोष ४, गोडभाषण ५, इंद्रियदमन ६, सत्यभाषण ७, शांती ८. दुष्ट जो आहे तो कठीण भाषण आणि निंदा याहींकरून थोरांची छळणा करितो; त्याचें पाप निंदा करणारास लागतें, साहतो त्यास पुण्य लागतें. दुष्टांजवळ दुसरें बळ नाहीं; कोणाचा घात करावा हेंच त्यांचें बळ. दुसऱ्याचें पारिपत्य करणें स्वाधीन आहे हें राजाचें बळ; आपल्या

भ्ताराची सेवा करून त्याची मर्जी संपादन करावी हें स्त्रीचें बळ; गुणवानपुरुष लोकांचे अन्याय क्षमा करितात हेंच त्यांचें बळ. मोजलेले शब्दांनीं भाषण करतां येणें फार अवघड आहे, तसेंच फार बोलून बोलण्यामध्यें अर्थ चमत्कार व शब्दचमत्कार न सोडणें हेंही अवघड आहे; सारांश, फार भाषण सगळेंच चांगलें पडत नाहीं; बोलण्यामध्यें चांगले शब्द पडले असतां बहुत हितकारक होताहेत, तेच वाईट पडले असतां अनर्थास कारण होतात. बाणांनीं छेदिलेलें अथवा कुऱ्हाडीनें तोडिलेलें वन पुनः पूर्ववत् होतें, परंतु वाग्बाणांनीं जें क्षत पाडिलें तें पूर्ववत् नीट होत नाहीं. प्रत्यक्ष बाण शरीरास बाहेरून लागतो ह्मणून काढायास शकतात, परंतु वाग्बाण शरिरांत प्रवेश करून काळजास झोंबतो ह्मणून काढितां येत नाहीं. वाग्बाण लागलेले पुरुषांस रात्रंदिवस विश्रांति पडत नाहीं, ह्मणून थोर आहेत ते वाग्बाणांनीं दुसऱ्यास दुखवीत नाहींत. विदुर ह्मणतो हे धृतराष्ट्रा, तुह्मापासून पांडवांचे अपराध फार घडले, त्यांची आजपर्यंत अवगण-

नाच झाली, तुझ्या पुत्रांनीं द्रौपदी सभेंत आणून तिला दुर्वचनाचे बाण मारिले व केशधरून ओढिली; हा मोठा अपराध केला. रावणानें सीता हरून मात्र नेली तितक्यानें तो प्राणास मुकला; तुह्मीतर फारच अमर्यादा केलीत, हे अपराध पाहून तुह्मास देवही कंटाळले, आतां तुमचा विनाशकाळ जवळ आला असें मला वाटतें; कांजर ज्याचा विनाशकाळ जवळ आला त्याचा बुद्धिभ्रंश होतो, त्यास वाईट कर्मे बरींशीं वाटतात; खोटी गोष्ट खरीच वाटत्ये दुसऱ्यानें खोटी ह्मणून सांगीतली तथापि खोटी वाटत नाहीं.

पांडवांशीं विरोध पडून तुझ्या पुत्रांचा बुद्धिभ्रंश जाहाला अशांवर तूं परम स्नेह ठेविलास, ह्मणून तुझेही बुद्धीस विपर्यास पडला हें तुला कसें समजत नाहीं? तर आतां सकळ राजलक्षणांनींयुक्त, त्रैलोक्याचेंही राज्य पाळण करायास समर्थ, आणि तुझ्या पुत्रांपेक्षां तुझी आज्ञा अधिक पाळितो, तसाच राज्याभिषिक्त पंडूचा वडिल पुत्र ह्मणून राज्यास अधिकारी असा जो धर्मराज त्यास राज्यासनीं स्थापण्याविषयीं तुझी बुद्धी

होवो. धर्मराजाचे गुण किती वर्णावे । जो आपलें राज्य दुर्योधन करितो आहे हें प्रत्यक्ष पाहूनही अद्यापि क्षमाच करितो, कां जर झुंजायास निघाल्यानें प्राणिमात्रास उपद्रव होईल; व तुझा अपमान होईल; या बुद्धीनें ज्याणें तुझे पुत्रांचे हातून बहुत आपमान, क्लेश आजपर्यंत सोशिले; तर अशा पुरुषाशीं अतःपर तुमचा स्नेह होईल तें त्वां वडिलपणीं पुढें होऊन करावें असें मला वाटतें.

# विदुरनीति.

## अध्याय तिसरा

धृतराष्ट्र ह्मणतो, हे विदुरा ! तूं बहुत चांगलें भाषण करितोस तें ऐकतां माझी तृप्ति होत नाहीं तर आणखीही कांहीं सांग. हा राजाचा आदर पाहून विदुर बोलतो, हे राजा ! सर्व तीर्थांचेठायीं स्नान आणि प्राणिमात्रांशीं प्रीति हीं दोन्ही पुण्याविषयीं थोर होत; त्यांतही प्राणिमात्रांशीं प्रीति ठेवणे हें सर्व तीर्थस्नानांपेक्षां अधिक होय; ह्मणून तूं पुत्रांसहित कपटवृत्ति सोडून पांडवांशीं स्नेह करून सुखी हो, तेणेंकरून यालोकीं कीर्ति पावोन देह सोडिल्यानंतर स्वर्गास जाशील. जंवपर्यंत यालोकीं पुरुषाची पुण्यकीर्ति लोकांचे तोंडीं राहाते तंवपर्यंत तो पुरुष स्वर्गीं वास करितो याविषयीं तुला एक पुरातन कथा सांगतों ती ऐक.

पूर्वीं कोणेएका राजाची कंन्या केशिनीनामक रू-

पलावण्यानें बहुत सुंदर होती, तीचे मनांतील उत्तम पति असावा अशी इच्छा समजोन तिच्या पित्यानें स्वयंवर आरंभिलें; तें ऐकून प्रल्हादाचा पुत्र विरोचन-नामा दैत्य ती आपणास स्त्री व्हावी ह्मणून तेथें आला-असतां त्याचा कांहीं छळ करावा ह्मणून केशिनी त्यास प्रश्न करिते, हे विरोचना ! ब्राह्मण श्रेष्ठ कीं दैत्य श्रेष्ठ तें सांग, जर ब्राह्मण श्रेष्ठ ह्मणशील तर सर्वांस मान्य असे राजासनीं तुह्मीं बसतां ब्राह्मण कां बसत नाहींत ? जर दैत्य थोर तर सर्वलोक ब्राह्मणांची पूजा कां करितात ? हें ऐकोन विरोचन उत्तर करितो, आह्मी विश्वस्रष्ट्या प्रजापतीपासून जाहालों ह्मणून सर्वांहून श्रेष्ठ, इतर लोक आह्माखालीं, आह्मापुढें देव ब्राह्मण हे काय पदार्थ ! तें ऐकून केशिनी ह्मणते या गोष्टीची परीक्षा येथेंच पाहूं, अंगिऱ्याचा पुत्र सुधन्वा ब्राह्मण उद्यां प्रातःकाळीं येणार आहे, तूंही ये.

दुसरे दिवशीं प्रातःकाळीं विरोचन व सुधन्वा केशिनीपाशीं आले, केशिनी सुधन्व्यास पाहतांच उभी

राहिली आणि दर्भासन बसायास देऊन पाद्य अर्घ्या-
दिकेंकरून त्याची पूजा करितीजाहाली. विरोचना-
स स्वर्णमय आसनावर बसविलें. त्या अवसरीं वि-
रोचन आपली थोरी उघड करावी ह्मणून सुधन्व्यास
बोलतो, हे ब्राह्मणा ! तें दर्भासन सोडून या स्वर्णमय
आसनावर मजजवळ बैस, तें ऐकून त्याचे मनांतील
अभिप्राय जाणून सुधन्वा उत्तर करितो हे विरोचना !
तुजबरोबर बसावें हें मला उचित नाहीं, तेसमयीं वि-
रोचन क्रोधयुक्त होऊन बोलतो, अरे भट्टा ! तूं बो-
लतोस तेंच खरें, तुझी आमची बरोबरी नाहीं तूं लां-
कडाचे तुकड्यावर अथवा गवतावर बसणार आणि
आह्मी स्वर्णमय आसनावर बसणार तस्मात् तूं व आह्मी
एकत्र बसावें हें आह्मासच योग्य नाहीं. सुधन्वा उ-
त्तर करितो, हे विरोचना ! तुझा बाप प्रल्हाद मला
स्वर्णमय आसनावर बसवून मजपुढें उभा राहून माझी
सेवा करितो हें तूं आठवीत नाहींस ? वीरोचन ह्मणतो,
आपले घरीं चालून आला तो श्रेष्ठ मानून त्याचा स-
त्कार करणे हें थोरांचें लक्षण शास्त्रांत सांगीतलें आहे,

ह्मणून तुला उंचासनीं बसवून माझा बाप तुजपुढें उभा राहातो यांत थोरपणा कोणाकडे येतो याचा विचार कर.

याप्रमाणें उभयतांचीं उत्तरप्रत्युत्तरें जाहल्यावर विरोचन बोलतो, हे ब्राह्मणा ! आह्मी दैत्य सर्वप्रकारें थोर अशी गोष्ट पदरीं घेऊन अतःपर आपल्या ज्ञातीचे महत्वाचा अभिमान सोड; हें न करिशील तर आपण कांहीं द्रव्यादिकांचा पण करून तिऱ्हाइतापाशीं जाऊं, तो सांगेल तें उभयतांनीं मान्य करावें. त्यावर सुधन्वा बोलतो, अह्मा ब्राह्मणापाशीं द्रव्यसंपत्ति नाहीं, तर तुझा आमचा पण हाच कीं जो हरेल त्याणें अग्निकाष्ठं खावीं. तिऱ्हाईत कोण ह्मणशील तर तुझाच बाप प्रल्हाद, तो सत्यशील आहे, कदापि तुजकरितां खोटं बोलणार नाहीं. विरोचनानें तो पण मान्य केला, नंतर उभयतां प्रल्हादापाशीं गेले असतां, प्रल्हाद सुधन्व्याचा सत्कार करून येण्याचें कारण पुसता जाहला. तें सुधन्व्यानें सांगीतल्यावर प्रल्हाद बोलतो हे सुधन्व्या ! विरोचन हा माझा एकुलता एक पुत्र

आणि तूं ब्राह्मण महातपस्वी, ह्मणून मला उभयपक्षीं-
ही बोलवत नाहीं. तें ऐकून सुधन्वा बोलतो, तूं राजा
न्यायकरता आणि आह्मी उभयतां वादी तुजपाशीं
आलों आहों, त्यास पुत्राचें अथवा ब्राह्मणाचें नातें
न पाहून सत्य असेल तें बोल; येथें भीड धरशील तर
दोषी होशील. तूं आमचा साक्षी होस, पक्षपात
सोडून जें वास्तविक दिसेल तें सांग, तुला भय नाहीं.
तें ऐकून मल्हाद सुधन्व्यास पुसतो, जो खरें खोटें
जाणतो परंतु दोन्ही बोलत नाहीं, अथवा जो खोटी
साक्ष देतो अथवा खोटा न्याय करितो, त्यास काय
पातक लागतें व त्या पातकापासून यालोकीं अथवा
परलोकीं काय दुःख होतें तें सांग, मग सुधन्वा बोलि-
ला राजा ऐक.

एके पुरुषास दोघी स्त्रिया, त्यांतून एकीवरच प्री-
ति करितो ह्मणून जें दुःख दुसरीस होतें, अथवा द्यूत
खेळून जो हरला त्यास जें दुःख होतें, अथवा आज
मोठें ओझें डोकीवर दिलें असेंच उद्यां देईल ह्मणून जें
दुःख सेवकास होतें, अथवा कोणी एखादा संभावित पुरुष

वाट चुकून एकटा फिरत असतां क्षुधेनें पीडित जाहला आहे इतक्यांत त्याचे शत्रूंनीं त्यास गांठला अशेसमयीं त्यास जें दुःख होतें, तें दुःख खोटी साक्ष देणारास प्राप्त होतें. शेळी इत्यादिक लहानपशूंसाठीं असत्य बोलतो, तो पांचपूर्वजांसहित नरकास जातो. गाईसाठीं खोटें बोलतो तो दाहापूर्वज घेऊन नरकास जातो. घोड्यासाठीं खोटें बोलतो तो शंभरपूर्वज घेऊन नरकास जातो. मनुष्यासाठीं खोटें बोलतो तो सहस्रपूर्वजांसहित नरकास जातो. जो द्रव्यासाठीं खोटें बोलतो तो पूर्वीं जहाले पुरुष आणि पुढें होणार जे त्यांस नरकास नेतो. भूमीसाठीं असत्य बोलतो त्याचें सर्वस्व नाश पावतें. तसेंच जो खरें खोटें जाणून साक्ष पुसली असतां साक्ष देत नाहीं, अथवा काम, क्रोध, लोभादिकेंकरून खऱ्याचा खोटा न्याय करितो त्यासही पातक लागून असेंच दुःख प्राप्त होतें, तर केशिनी हो उत्पत्तिकरण्याविषयीं भूमिसमान आहे ह्मणून येथें खोटें बोलणें त्वां सर्वथा नकरावें. तें ऐकून प्रल्हाद आपल्ये पुत्रास ह्मणतो हे विरोचना, मजहून सुधन्व्याचा

पिता अंगिरा श्रेष्ठ, तुझे मातेहून याची माता श्रेष्ठ, तुजहून सुधन्वा श्रेष्ठ, सुधन्व्यानें तुला जिंकिलें, सुधन्वा आतां तुझ्या प्राणाचा धनी होय. अशीं बापाचे तोंडचीं अक्षरें ऐकून विरोचन बहुतखिन्न जाहला, तें पाहून प्रल्हाद सुधन्व्याची प्रार्थना करितो, हे ब्रह्मणा! आतां माझा पुत्र मला प्राणासहित कृपाकरून दिला पाहिजे हें तुजपाशीं मागतों. तेव्हां सुधन्वा प्रसन्न होऊन बोलतो, प्रल्हादा पुत्राची ममता नधरितां सत्यवचन बोलिलास, तस्मात् तूं धन्य होस, तुला पुत्र प्राणासहित मी पुनःदिला; आतां केशिनी याची स्त्री होऊ, असा आशिर्वावाद देऊन सुधन्वा आपल्ये आश्रमास जाता झाला.

याप्रकारें तो प्रल्हाद पुत्राचा पक्षपात न धरून पुत्रासहित सुखी जाहला, ही त्याची पुण्यकीर्ति त्या दिवसापासून सर्व लोक गाताहेत. अशी कथा सांगून विदुर ह्मणतो राजा! पुत्रांस पृथ्वी पाहिजे ह्मणून पृथ्वी मिळवायासाठीं असत्य बोलून पुत्रप्रधानासहित नाश पावूं नको. गोवारी जसा हातीं काठी

घेऊन गाईस राखितो, तसे देव हातीं काठी घेऊन मनुष्यांस राखीत नाहींत; ज्या पुरुषास राखुं इच्छितात त्यास बुद्धि उत्तम देतात, त्यावरून देवांची कृपा समजावी. पुरुष जसेंजसें बरें कर्म करितो तसे तसे त्याचे सकळ मनोरथ सिद्ध होतात. ब्राह्मण कुळांत उत्पन्न, सर्वकाळ वेद ज्याचे मुखांत, परंतु ज्याचे अंतरीं कपट अशा पुरुषाचें रक्षण देवाच्यानेही होत नाहीं; तेथें राजा तुमची आमची काय कथा? ह्मणून त्वां कपट सोडावें. मद्यपान्याशीं गोष्टी, निमित्तावांचून कलह, बहुतांशीं वैर स्त्रीपुरुषांचा वियोग करणें कुटुंबांत किंवा जातींत कज्या लावणें, राजद्वेषकरणें, स्त्रीपुरुषांमध्यें वैर उत्पन्न करणें, कुमार्गीं जाणें, हीं सर्वथा वर्ज करावीं. साक्षीविषयीं हे सात योजूं नयेत, सामुद्रिक लक्षण जाणतो तो १, मापांत लबाडी करणारा वाणी २, जुगारी अथवा फांसे टाकून शकुनादिक सांगून लोकांस ठकवितो तो ३, पोटभरू वैद्य ४, या चौघांचें पैशाकडेस लक्ष असतें ह्मणून वर्ज करावे; तसाच कदाचित् विपरीत साक्ष देईल ह्मणून

शत्रू ५, लोकांस खरें वाटणार नाहीं ह्मणून मित्र ६, भडवा अथवा शिनळ पुरुष अथवा कैफी ७, हे साक्षीस बोलावूं नयेत.

हीं चार सत्कर्मैं अभय करणारीं आहेत परंतु अविधीनें केलीं असतां महाभयकारक होतात. लोकांनीं आपणास थोर ह्मणावें यासाठींच अग्निहोत्र घेणें १, महत्त्वासाठीं मौन धरणे २, लोकांनीं ज्ञानी ह्मणावें ह्मणून अध्ययन करणें ३, प्रतिष्ठेसाठीं यज्ञ करणें ४. हे अठरा जण ब्राह्मण हत्या करणाराचे समान होत, दुसऱ्याचें घर जाळितो तो १, विष घालितो तो २, आपल्ये स्त्रीनें जारकर्म केलें त्यापासून पुत्र जाहला त्या पुत्रानें मिळविले धनानें पोट भरितो तो ३, मद्य विकणारा ४, बाणादिक शस्त्रें करणारा ५, दुसऱ्याचे दोष लोकांस सांगतो तो ६, मित्राशींद्रोहकर्ता ७, परस्त्रीशीं जातो तो ८, औषधादिक देऊन गर्भ पाडितो तो ९, गुरुपत्नीशीं जाणारा १०, मद्यपानी ब्राह्मण ११, विश्वास घातकी १२, दुःखितांस दुःख देणारा १३, परलोक खोटा ह्मणणारा १४, वेदांची निंदा क-

रणारा १५, राजसत्तेचे बळानें जो लोखंडाची खोंची मारून धान्याचे कोथळ्यांतील अथवा मुड्यांतील धान्य घेतो तो १६, स्वधर्म सोडून व्रात्य होऊन भटकत फिरतो तो १७, शरणागतांस मारणारा १८. अंधारीं दिव्यानें समजतें, सदाचरणानें धर्म समजतो, आचरणानें साधू समजतो, भयप्राप्तीचे वेळीं शूर समजाते, दरिद्रीपणांत धैर्य समजतें, संकटकाळीं शत्रु अथवा मित्र हे समजतात, ह्मातारपण रूप नेतें आशा धैर्य नेते, मृत्यु प्राण नेतो, द्वेष धर्म नेतो, क्रोध लक्ष्मीचा नाश करितो, नीचसेवा उत्तमस्वभाचा नाश करिते, काम लज्जेचा नाश करितो, अभिमान सर्वांचा नाश करितो, लक्ष्मी सत्कर्मानें उत्पन्न होते, जपून चालिल्यानें वाढते, इंद्रिय निग्रहानें अक्षय होते. बुद्धिमानपणा १, भलेपणा २, इंद्रियें जिकणें ३, शास्त्राभ्यास ४, पराक्रम ५, परिमित बोलणें ६, यथाशक्ति दान ७, परोपकार जाणणें ८, हे आठ उत्तम गुण ज्या पुरुषाचा राजानें सत्कार केला त्यास बलात्कारेंच अनुसरतात. तर हे राजा, कर्णादिकांचाठायीं हे गुण दिसतात ते स्वाभा-

विक नव्हत, त्यांचा तूं बहुमान करतोस ह्मणून भासताहेत मात्र.

हीं आठ स्वर्गप्राप्ती करणारीं होत; यज्ञ १, दान २, अध्ययन ३, तप ४, इंद्रियदमन ५, सत्य ६, धर्म ७, सरळपणा ८. यांतून चार प्रथमचीं सत्पुरुषांस अनुसरून राहताहेत आणि चार शेवटचा साध्य होण्यास सत्पुरुषांसही यत्न लागतो. धर्माचे मार्गाचे हे आठ प्रकार जाणावे, यज्ञ १, अध्ययन २, दान ३, तप ४, सत्य ५, क्षमा ६, दया ७, निर्लोभपणा ८. वडील वडील ज्या सभेस नाहींत ती सभाच नव्हे; धर्म जे बोलत नाहींत ते वडीलच नव्हत; ज्यांत सत्य नाहीं तो धर्मच नव्हे; कपटभाव जेथें आहे तें सत्यच नव्हे. हा दाहागुणांचा समुदाय स्वर्गप्राप्तीचा कारण होय, सत्य १, नम्रता २, शास्त्राभ्यास ३, उपासना ४, कुलीनपणा ५, सुस्वभाव ६, बळ ७, धन ८, शूरत्व ९, उचितभाषण १०. पातककरून अधिकाधिक पातकाचाच संग्रह करितो, पुण्यकरून उत्तरोत्तर पुण्यच जोडितो, यासाठीं पाप करूंनये; पापकेल्यानें बुद्धीचा

भ्रंश होतो, बुद्धिभ्रंश जाहल्यावर पापावांचून दुसरें कांहींच सुचत नाहीं; पुनः पुनः पुण्य केल्यानें सुबुद्धि वाढते. सुबुद्धि वाढल्यानें नित्य नित्य पुण्यच करितो, तस्मात् समाधानवृत्तीनें पुण्यच करीतअसावें.

दोषदृष्टि, मर्मभेदक, कठोरबोलणारा, वैर लावणारा, कपटी, असा जो पुरुष तो पापें करितां करितां दुःख पावोन शेवटीं नरकास जातो. निर्दोषदृष्टि, ज्ञानी, सदा उत्तमकर्मकरणारा जो तो दुःख पावत नाहीं सर्वत्र शोभाच पावतो. ज्ञातेपुरुषांची संगत करून आपलें ज्ञान जो वाढवितो तो उचितकर्में करून आपलें सुख वाढवितो. दिवसास असें कर्म करावें कीं जें केल्यानें रात्रीस निद्रा स्वस्थ येईल. आठ महिन्यामध्यें असें करावें कीं जेणेकरून चातुर्मास सुखानें जाईल. पूर्ववयामध्यें असे करावें कीं, जेणेकरून वृद्धापकाळ सुखानें जाईल. जिवंतपणीं असे करावें कीं, जें केल्यानें मेल्यानंतर सुख होईल.

जिरलेलें अन्न, तारुण्यगेलेली बायको, युद्धांत पारपडलेला शूर, तत्त्वप्राप्त झालेला तपस्वी, यांची प्रशंसा

सर्वलोक करितात. अधर्मानें लाभलेले द्रव्यानें पुरुष आपलें पाप झांकूं इच्छितो, परंतु तें पातक अधिक प्रसिद्ध होतें झांकत नाहीं. गुरु शिष्यांस शासन करितो, राजा दुष्टांस शासन करितो, यम,गुप्त पापें करितात त्यांस शासन करितो. ऋषि आणि नदी यांचे कुळ, थोरांचें माहात्म्य, स्त्रियांचीं दुराचरणें यांचा शोध लागत नाहीं. ब्राह्मणाची पूजा करणारा, दाता, ज्ञातीचा संतोष करणारा, सदाचारानें युक्त, असा जो क्षत्रिय तो बहुत काळ पृथ्वीचें पालन करितो.

सुवर्ण पुष्पमय पृथ्वी तिचीं फुलें तिघे वेंचितात, शूर १, विद्वान् २ जो सेवाकरून स्वामीस प्रसन्न करायास जाणतो तो ३. स्वबुद्धीनें विचारपूर्वक केलें कर्म श्रेष्ठ होय, अंगबळानें जें केलें तें मध्यम, आणि कपटानें जें केलें तें नीच. दुर्योधन शकुनि परममूर्ख, दुःशासन, तसाच कर्ण यांजवर राज्यभार ठेऊन तूं ऐश्वर्य इच्छितोस तें कसें प्राप्त होईल? तर आतां सर्व गुणांनीयुक्त आणि तुला पिता असें मानितात, असे जे पांडव त्यांवर त्वां पुत्रांसारिखी कृपा ठेवावी हें उत्तम आहे.

# विदुरनीति.

## अध्याय चवथा.

विदुर ह्मणतो हे धृतराष्ट्रा, तुला मी यांप्रसंगीं आत्रेयऋषि आणि साध्यदेव यांचा संवाद सांगतों ऐक. कोणेएकेसमयीं आत्रेयऋषीस साध्यदेव पुसते झाले, हे ऋषे। तूं बुद्धिमान् आणि शास्त्राचें तत्त्व जाणता आहेस तर कृपाकरून आह्मांस ज्ञानी पुरुषाची लक्षणें सांग, तेणेंकरून आह्मी आपलें हित समजून सुख पावूं. ही प्रार्थना ऐकून ऋषि बोलतो, हे देवहो। ज्याणें सर्व इंद्रियें जिंकिलीं, योगमार्ग अभ्यासून जो समाधिसुख घेतो, ज्याणें मनोमळ धुवोन अंतःकरण शुद्ध केलें, जो सुख आणि दुःख समान मोजितो, तो ज्ञानी जाणावा. दुसरा कोणानें आपणास वाईट बोलिला तें सोशितो उलटून वाईट बोलत नाहीं, तेणेंक-

रून त्यास पश्चात्ताप उत्पन्न करून स्वयें पुण्य जोडितो; जो क्रोध टाकितो, दुसऱ्याचा अवमान करीत नाहीं; मित्रद्रोह करीत नाहीं; नीचसेवा, अभिमान, दुष्टस्वभाव हीं, जो सोडितो; दुसऱ्याचे ऱ्हदयास, माणास अथवा अस्थींस किमपि संताप होईल ह्मणून जो कठीण वचन बोलत नाहीं आणि दुसऱ्यानें अग्नीसारिखे संताप करणार अशे वाग्बाणांनीं ताडिला असतां जो विचार करितो कीं, हा जर मला वाईट न बोलता तर मी क्षमा कोणास करितों? क्षमा केली नसतां पुण्य कसें जोडतें। असें जाणून जो निंदकाचा उपकारच मानितो, अशा पुरुषास ज्ञानाचें सार समजलें असें जाणावें.

जसा सहवास करावा तसा गुण प्राप्त होतो; साधूचे संगानें साधु होतो, मूर्खांचे संगानें मूर्ख होतो, चोराचे संगानें चोर होतो, जसें शुभ्र धुतलेलें वस्त्र ज्या रंगांत घालावें तो रंग घेऊन उठतें. स्वयें कोणास छळीत नाहीं व दुसऱ्याचे हातून छळवीत नाहीं, आपल्यास उपद्रव झाला असतांही जो दुसऱ्यास न-

डायाची इच्छा करीत नाहीं, मग न झाल्यास नडत नाहीं ह्मणून काय सांगावें ! असा जो पुरुष त्याचे संगतीची देवही वांछा करितात. मुकें राहावें त्यापेक्षां सत्य बोलावें हें बरें, सत्य असून प्रिय बोलावें हें त्याहून अधिक, सत्य प्रिय असून धर्मयुक्त बोलावें तें सर्वोत्कृष्ट. जशा पुरुषां बरोबर बसतो, जशा पुरुषांची संगत करितो, जशी स्थिति धरायास इच्छितो, तसा तसा पुरुष होतो. पुरुष ज्या ज्या दुःखदायक गोष्टींपासून सुटायास इच्छील, त्यां त्यां पासून सुटेल; जो सर्व प्रपंच सोडील त्याला काडीमात्रही दुःखहोणार नाहीं, जें जें साधील तें तें साधेल, पुरुषास असाध्य कांहींच नाहीं. या प्रकारें आत्रेयऋषि साध्यदेवांशीं बोलून तपोवनास जाता जाहला, हें सांगून विदुर बोलतो हे धृतराष्ट्रा ऐक.

जो पुरुष अनीतीनें कोणास जिंकीत नाहीं, व दुसऱ्याचे हातून जिंकिला जात नाहीं, कोणाशीं वैर करीत नाहीं, निंदा आणि स्तुति समान मानितो, हर्ष, शोक करीत नाहीं, प्राणिमात्रानें सुखी असावें, अक-

ज्याण कोणाचें नसावें, असें इच्छितो, जो सत्य भाषण करितो, मवाळ ज्याची प्रकृति, ज्याचीं इंद्रियें स्वाधीन, अशा मनुष्यास उत्तम पुरुष ह्मणतात. गोड बोलून उगाच भरंवसा देत नाहीं, देईन असें मुखांतून निघाल्यास देतो, दुसऱ्याचे छिद्रांचा शोध ठेवितो, असा जो तो मध्यम पुरुष जाणावा. ज्याणें उपकार केला त्यास अपकार करितो, जो केवळ दुराचरणी, ज्याचें कोणाशींच इष्टत्व नाहीं, जो दुसऱ्यानें बरी गोष्ट सांगितली ऐकत नाहीं, मित्रास जो ठकवितो तो अधम पुरुष जाणावा. जो आपलें बरें इच्छितो त्याणें उत्तमाची संगति करावी, प्रसंग पाहून मध्यमाचीही करावी परंतु नीचाची कदापि करूनये.

लोकांची वंचना करून सर्वदा धनसंग्रह करितो, आपण थोर, शाहाणा, पराक्रमी असें मानितो, असा जो त्यास लोकांत थोरपणा नाहीं; तो थोर कुळांतला जरी आहे तथापि त्या कुळाचे योग्यतेस पावत नाहीं. धृतराष्ट्र पुसतो हे विदुरा ! मी थोर कुळाचें माहात्म्य फार ऐकतों, त्यांत जन्म व्हावा अशी देवही वांछा

करितात, मग इतर करितील ह्मणून काय सांगावें ! तर कृपाकरून थोर कुळांचीं लक्षणें सांग. विदुर बोलतो, तप १, इंद्रियांचा जय २, वेदशास्त्राध्ययन ३, यज्ञ ४, पुण्यकर्में ५, विवाहादिक उत्साह ६, निरंतर अन्नदान ७, हे सात गुण जेथें उत्तम प्रकारें राहतात तीं थोरकुळें ह्मणावीं. जेथें दुराचरण नाहीं, जेथें आईबाप दुःख पावत नाहींत नित्य संतुष्ट राहतात, जेथें धर्माचरणकरण्याचा उत्साह फार, आपले कुळाची सत्कीर्ति व्हावी अशी जेथें सर्वांस इच्छा. असत्य जेथें राहत नाहीं, तीं महाकुळें जाणावीं. जेथें यज्ञादिककर्में होत नाहींत, जेथें विकल्प घेऊन वेदाची निंदा होत आहे, ब्राह्मणांची अमर्यादा, ताडण, निंदा जेथें होतात, ठेवायास दिलेले वस्तूचा जेथें अपहार होतो, जीं सदाचरणहीन, तीं असत्कुळें जाणावीं. वक्तृत्वानें अथवा विद्येनें अथवा ज्यांत रूपवान् मनुष्य आहेत, अथवा द्रव्य पुष्कळ आहे ह्मणून उत्तम कुळ होत नाहीं, ज्याकुळांत उत्तम आचरण आहे तेथें थोडकेंही

धन असलें, तथापि तें थोर कुळ ह्मणवितें, आणि मोठी कीर्ति मिळवितें; ह्मणून यत्नेकरून नित्य सदाचरण करीत असावें. द्रव्य येतें जातें, द्रव्यानें हीन जाहला तो हीन नव्हे, सदाचरणानें जो हीन तो हीन ह्मणावा. सदाचरणहीन जीं कुळें तीं विद्येनें, गोधनानें, अश्वादिकानें अथवा मोठें शेतिक आहे ह्मणून उंच होत नाहींत. राजा ! आमच्या कुळामध्यें वैर करणारा कोणी नसो. आमचे कुळांतील राजा अथवा प्रधान अथवा आणखी कोणी सत्ताबळानें दुसऱ्याचें द्रव्य हरण न करून, मित्र द्रोह करणारा, कृत्रिमी, असत्य बोलणारा, देव, पितर, अतिथी, यांस दिल्याचे पूर्वी भक्षण करणारा, हे नसोत, कारण हे कुळघातकी होत. जो ब्राह्मणांचा घात करितो, जो ब्राह्मणांचा द्वेष करितो, जो वडिलांचें संरक्षण करीत नाहीं, तो आमचे कुळांत नसो.

कोणी आपले घरीं आला त्यास बसायास जागा १, पाट २, पाणी ३, आणि गोड बोलणें ४, हीं चार साधूचे घरीं नित्य राहतात. हा सत्कार घरीं आले-

त्यास केला असतां पुण्यकर्म करणारे भक्तिमान् जे पुरुष त्यांचा मान वाढवितो. लाहान रथ जरी असला तथापि मोठा भार साहतो, तसा भार दुसऱ्याच्यानें घेववत नाहीं, याचप्रकारें थोरकुळींचे जे पुरुष आहेत ते लोकांचा भार साहवा, ह्मणजे लोकांचें दुःख आपण घेऊन त्यांस सुखी करावें ह्मणून जन्मले आहेत. हें त्यांचें कर्म इतर मनुष्यांच्यानें होत नाहीं.

मित्रास राग आला ह्मणून भितो, अथवा मित्राशीं बोलायास शंका धरितो, तेथें मित्रत्व आहे असें ह्मणूं नये; तर जो मित्राशीं बापासारिखा विश्वास ठेऊन बोलतो त्याचे नाव मित्र, इतर लोक वळखीदेखी मात्र; मित्र नव्हत. जो नम्रतेनें आपणाशीं भाषण करितो, आणि सर्वदा आपलें हित इच्छितो तो मित्र, तोच बंधु, असें जाणावें, तो परका ह्मणून परका असा मोजूं नये. जो चंचळ बुद्धीचा पुरुष, जो आपले वडिलांचा मान राखीत नाहीं, त्याशीं स्नेह फार दिवस राहाणार नाहीं. जो चित्ताचा चंचळ, मनाचा कपटी, इंद्रियांचा अंकित, अशा पुरुषास दैवयोगानें सर्व अर्थ प्राप्त झाले तथापि

ते त्यास शिवत नाहींत, ह्मणजे सुखदायक होत नाहीं-त; जसे कोरड्या तळ्यास पक्षी शिवत नाहींत, जवळ मात्र राहतात. कारणावांचून अकस्मात् कोप करावा, अथवा अकस्मात् प्रसन्न व्हावें, हा हलके माणसाचा स्वभाव; ज्या मित्रानें पूर्वी आपणावर उपकार केले आहेत, संकटीं कामास पडला आहे, त्या मित्रास समयीं जो उपयोगीं पडत नाहीं, तो मरून कदाचित् गिधाचे हातीं पडला असतां, तेही कृतघ्न असें जाणून त्याचे मांसास स्पर्श करीत नाहींत; ह्मणून आपले जवळ द्रव्य असो अथवा नसो, परंतु आपल्या सामर्थ्याप्रमाणें मित्रानें सांगितल्यावांचूनही त्याचे उपयोगास पडावें; हात जसे प्रार्थिल्यावांचून आपलें मित्र जें शरीर त्यास राखितात, पापण्या जशा डोळ्यांस राखितात, असा ज्या मित्राचा स्वभाव असेल तो मित्र ह्मणावा.

आपणास कदापि संताप होऊं देऊंनये, कां संतापापासून रूप, बल, ज्ञान, यांचा नाश आणि रोगप्राप्ति होताहेत; जें प्राप्त व्हावयाचें नाहीं तें शोक सं-

ताप केल्यानें प्राप्त होत नाहीं, परंतु आपले शत्रूंस आनंद मात्र होतो. मनुष्य पुनः पुनः होतो, मरतो, लाहान होतो, वाढतो, मागतो, मागवितो शोककरितो, करवितो, सुख, दुःख, जन्म, मरण, लाभ, हानि, हीं एकामागें एक मनुष्यमात्रास होताहेत, तस्मात् धीरवान् जो आहे त्याणें यांचा हर्ष किंवा शोक करूंनये.

एवढें ऐकून धृतराष्ट्र बोलतो, हे विदुरा! व्रतें उपवास करून कृश झाला असतांही तेजःपुंज असा पुण्यात्मा जो धर्मराजा, त्यास म्यां कपटेंकरून छळिलें; तो आतां युद्धकरून माझ्या पुत्रांचा घात करील; त्वां पुष्कळ उपदेश केला तथापि उद्विग्न जाहालेलें माझें चित्त शांत होत नाहीं; तर जेणेंकरून मी समाधान पावेन तें सांग. तें ऐकून विदुर ह्मणतो, अध्ययनेंकरून प्राप्त जाहली विद्या, इंद्रियनिग्रह, लोभाचा त्याग, यांवांचून तुझी शांति होणार नाहीं. मन शांत केल्यानें दुःख दूर होतें, तपानें सद्गुरु लाभतो, गुरुसेवेनें ज्ञान प्राप्त होतें, सर्व चित्तवृत्ति बंदावर ठेविल्यानें शांति होते, शांति प्राप्त जाहली असतां देहादिक इहलौकिक

पदार्थ सर्व तुच्छ असे वाटतील, तेथें राज्यावर तुझी आसक्ति होणार नाहीं हें काय सांगायाचें! मोक्षाविषयीं यत्न करणार जे ते परोपकारार्थच दानें करितात, ज्ञानप्राप्ति व्हावी ह्मणूनच वेदशास्त्राध्ययन करितात, ते या दोहों कर्मांचे पुण्यापासून स्वर्गादिक प्राप्ति इच्छिणें तुच्छ असें समजून करीत नाहींत, तर इहलौकिक पदार्थांवर प्रीति किंवा अप्रीति हीं दोन्ही न करून मोक्षप्राप्तीची योग्यता येईपर्यंत पुनः पुनः जन्म घेऊन मृत्यु लोकींच संचार करिताहेत.

संसारापासून सुखाची इच्छा करणार जे त्यांस मऊ आंथरुणावरही नीज येत नाहीं, त्यांस स्त्रियांपासूनही सुख होत नाहीं, त्यांस विश्रांति नाहीं, त्यांस मोठेपणा नाहीं, त्यांस शांति नाहीं, त्यांस स्वहित समजत नाहीं, योग ह्मणजे अप्राप्त वस्तूचा लाभ, क्षेम ह्मणजे प्राप्त वस्तूचें रक्षण, तो योगक्षेम त्यांस होत नाहीं, विशेष काय सांगावें त्यांस जी गोष्ट बरी ती वाईट दिसती, ज्या गोष्टीपासून आपलें वाईट होणार ती बरी दिसती; गायीचेठायीं दूध, ब्राह्मणांचेठायीं तप, स्त्रीचेठायीं चपळबुद्धि

जशी राहत्ये तसाच ज्ञानी पुरुषाचेठायीं निर्भयपणा नित्य राहतो. तर हे राजा! जे तुझे कुळाचे तंतू, ज्यांस तूं बहुत वर्षें पाळिलेंस असे जे पांडव, ते तुझ्या बहुतां पुत्रांपासून वनवासादिक बहुत दुःख साहताहेत, ह्मणून लोकांमध्यें साधूंस उपमा देणें जाहली तर ह्मणतात कीं हा साधू पांडवांसारिखा आहे; दुसरे जे तुझे आहेत ते पांडवांसारिखे नाहींत; पेटलेलीं लांकडें वेगळीं केलीं असतां धूर करून त्रास देतात, एकत्र केलीं तर पेटून संताप करितात तसे तुझे पुत्र होत. ह्मणून तूं पांडवांशीं मीति करून ज्ञानी पुरुषांसारिखा निर्भय हो.

ब्राह्मण १, स्त्री २, ज्ञाती ३, गाय ४, यांजवर जे पराक्रम करितात, ते पिकलेलें फळ झाडापासून जसें पडतें, तसे त्याचें पाप भरलें ह्मणजे नाश पावतात. मुळें रुजून सदृढ झाला असाही मोठा बळकट जरी वृक्ष आहे, तथापि एकटाच असलातर त्यास मोठा वारा पाडितो, परंतु जे वृक्ष एकामेकांच्या आश्रयानें एकत्र आहेत, ते मोठ्याही वाऱ्याचा उपद्रव साहूं शकतात, ह्मणून एकटा पुरुष मोठा बलवान्, शाहाणा असला तथापि ए-

कटे झाडासारिखा शत्रूपासून नाश पावतो. एकामेकांचा आश्राय धरून असल्यानें ज्ञाति वाढते, जसीं जळांत कमळें वाढतात. ब्राह्मण, गायी, ज्ञाति, बाळकें, स्त्रिया, तसेच ज्यांचें अन्न खाल्लें ते अथवा जे शरण आले ते, इतक्यांस मारणें योग्य नव्हे. हे राजा! सधनपणा आणि निरोगीपणा हीं दोन या लोकीं सुखाचीं कारणें होत; रोगी जे आहेत ते मेल्यांत मोजावे, त्यांस धन असून काय उपयोगी! तुला हीं दोनीं अनुकूल असून रोगीसा दिसतोस, तर हा क्रोधरूपी रोग तुला पांडवांपासून प्राप्त झाला आहे, यास दुसरे कांहीं निमित्त दिसत नाहीं, जो फार कडू, ज्यापासून तुझे मस्तकांत भ्रम शिरला आहे, जो फार कठोर आणि तिखट आहे, ज्यास साधु मात्र पिताहेत, इतरांस पिववत नाहीं, अशा क्रोधास तूं पिऊन जाशील तरच सुखी होशील, याशिवाय दुसरा उपाय नाहीं.

रोगानें पीडिले मनुष्यास पुत्र, पौत्र, विषयभोग, धन, यांपासून सौख्य होत नाहीं. रोगी जो तो नित्य दुःखी होय. थोर आहेत ते कपटविद्येचा आश्र-

य करीत नाहींत, जो आपले केलेलें साहतो त्याजवर पराक्रम करणें योग्य नव्हे, आणि अशावरही क्रूर होऊन जो लक्ष्मी संपादितो त्याची लक्ष्मी स्थिर राहणार नाहीं, तर धर्मानें जी मेळविली तीच बहुकाळ राहील.

हे धृतराष्ट्रा ! मी तुला सार गोष्ट सांगतों, तुझे पुत्र पांडवांचें रक्षण करोत, पांडव तुझ्या पुत्रांस रक्षोत, यांचे शत्रु, मित्र, ते त्यांचे, त्यांचे ते यांचें, यांचें कार्य तें त्यांचें, त्यांचें तें यांचें, हा भाव परस्परांचें मनांत वसोन सुखी नांदोत. तूं राजा आज कौरवांमध्यें मुख्य आहेस, तुझे स्वाधीन सर्व आहेत, तर पांडवांस हातीं धरून आपली कीर्ति रक्षण कर. कौरव पांडवांचें ऐक्यकर, तुह्मांमध्यें फूट करायास इच्छितात ते शत्रु असें जाणून त्यांचे पाय मोड, पांडव सत्यधर्मानें चालताहेत ह्मणून जय पावतील, हें निःसंशय जाणून तूं दुर्योधनास युद्ध करण्याचे भरीस घालूंनको. यांत मला तुझें कल्याण दिसतें.

# विदुरनीति.

## अध्याय पांचवा.

---

विदुर ह्मणतो, हे धृतराष्ट्रा ! पूर्वी स्वायंभुव मनु सतरा मूर्खांचीं लक्षणें बोलिला आहे तीं सांगतों ऐक, हे सतराजण अत्यंत मूर्ख, आकाश बुक्या मारून फोडायास इच्छिणारे अथवा आकाशीं इंद्राचें धनुष्य मोडायाचा उद्योग करणारे, अथवा चंद्रसूर्यांचीं किरणें मुठींत धरूं लागणारे, अशीं अशीं न व्हावयाचीं तीं कर्मे करणारे जाणावे. कुशिष्यास उपदेश करून गुरुपणा इच्छितो तो एक मूर्ख १, थोडा लाभ झाला ह्मणून हसतो तो २, शत्रुची सेवा करून कल्याण इच्छितो तो ३, द्वाड स्त्रीची चौकशी राखून तिजपासून बरें इच्छितो तो ४, मागूंनये तें मागतो तो ५, थोडें करून मोठी प्रतिष्ठा सांगतो तो ६, अनुचितकर्म करून कु-

लीनपणा इच्छितो तो ७, विश्वासास योग्य नव्हे त्याजवळ विश्वासानें बोलतो तो ८, आपण निर्बळ असून बळवानाशीं नित्य वैर करितो तो ९, जी न इच्छावी ती वस्तु इच्छितो तो १०, कोकीशीं बाप हास्य विनोद करीत असतां ज्या सासऱ्यास क्रोध येतो तो ११, सुनेचे बापाचे कुटुंबापासून आपली उपजीविका चालत असतां तिकडून मान इच्छितो तो १२, परस्त्रीशीं रत होऊन निर्भयता इच्छितो तो १३, आपले स्त्रीशीं अमर्याद भाषण करून दादलेपणाचा मान इच्छितो तो १४, आपणाजवळून कांहीं गोष्ट जाहली ती ज्यास पक्की ठाऊक त्यास भ्रांतींत घालायास इच्छितो तो १५, तीर्थीं ज्यास वाचादत्त केलें तो याचक घरीं मागायास आला असतां त्यास तें न देऊन त्या तीर्थीं बहुत दान केल्याच्या गोष्टी सांगतो तो १६, दुष्टांस साधूपणाचा उपदेश करितो तो १७, जसा जो आपणाशीं वर्ततो तसें आपण त्याशीं वर्तावें, कपट्याशीं कपटी व्हावें, भल्याशीं भलें व्हावें. हे धृतराष्ट्रा ! तुला मी एक वेळ पूर्वीं सांगितलें आहेच पुनःही सांगतों, कीं केवळ

अभिमानासाठींच अभिमान धरिल्यानें धनसंपत्ति प्राणादिक सर्वस्व जातें. धृतराष्ट्र प्रश्न करितो, हे विदुरा! सर्व वेदशास्त्रांचेठायीं प्राण्यास शंभरवर्षें आयुष्य सांगितलें आहे, असें असून त्या पूर्वींच कां मरतात? विदुर त्याचीं कारणें सांगतो. थोरास तुच्छकरून बोलणें १, सर्वांहून आपली आढ्यता मिरवणें २, द्यावयास योग्य तें नदेणें ३, कारणावांचून क्रोध करणें ४, दुसऱ्याचे उपयोगी नपडून आपले शरीरास सुख होईल तें तें मात्र करणें ५, मित्राशीं द्वेष करणं ६. हे सहा तिखट तरवारी होऊन प्राण्याचें आयुष्य तोडितात, मृत्यु तोडीत नाहीं. ज्याणें विश्वासानें जवळ केला त्याचे स्त्रीपाशीं जातो तो १, गुरुचे स्त्रीशीं जातो तो २, ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, यांतिहींमधला असून शूद्रस्त्रीशीं जातो तो ३, मद्यपी ४, वडिलांस आज्ञा करितो तो ५, दुसऱ्याचे उपजीविकेचा छेद करितो तो ६, वेदशास्त्रसंपन्न ब्राह्मणास चाकराचें काम सांगतो तो ७, शरणांगतास मारितो तो ८, हे आठ ब्रह्महत्या करणाराचे तोडीचे, तसेच आपले आयुष्याचा घात करणारे होत,

यांशीं संसर्ग जाहाला असतां प्रायश्चित्त करावें. गुरूचें वाक्य पाळणारा, न्याय अन्याय जाणून वर्तणारा, दाता, देवब्राह्मणांस देऊन जेवणारा, हिंसा न करणारा, अनर्थकारि कर्म न करणारा, उपकारास प्रत्युपकार करणारा, सत्य आणि मवाळ बोलणारा, असा पुरुष स्वर्गी जातो. हे राजा! निरंतर गोड बोलणारे पुष्कळ मिळतील, परंतु कडू बोलून आपले बऱ्याची गोष्ट सांगतो असा बोलणारा आणि ऐकणारा हे दोन्ही दुर्लभ. राजास गोड वाटो अथवा कडू वाटो, परंतु जो त्याचे कल्याण इच्छून नीति असेल तेंच बोलतो तो सहाय ह्मणावा; आणि असे लोक जवळ असतील तर ह्मणावें कीं तो राजा सहायवान् ह्मणजे सबळ आहे, इतर पोटार्थी जवळ असून फळ काय. कुळांत एक पुरुष वाईट आहे तो सोडिल्याने कुळाचें रक्षण होत आहे तर टाकावा, गांवाचे रक्षणासाठीं एक कुळ टाकावें, सर्व देश रक्षणासाठीं एक गांव टाकावा, आपले रक्षणासाठीं सर्व पृथ्वीचें राज्य टाकावें, संकटकाळीं उपयोगास पडेल ह्मणून धनाचें रक्षण करावें,

स्त्रीपुत्रांचे रक्षणार्थ धनाचा व्यय करावा, धन स्त्रीपुत्रादिक सर्व जाऊन आपलें रक्षण होतें नाहीं तर होत नाहीं, अशी अडचण पडून दुसरा उपाय नाहीं असें जाहल्यास तें करून आपलें रक्षण करावें; कांकीं शरीर राहिलें तर आपलें सार्थक करितां येईल.

हे धृतराष्ट्रा! द्यूत हें वैर उत्पन्न करणार होय, यास्तव भल्यानें कर्मणुकेसाठींही खेळूनये, हें बरें नव्हे असें तुला म्यां खेळतांवेळेंच सांगितलें होतें, परंतु रोग्यास मरण जवळ आलें असतां जसें गुणकारि औषध रुचत नाहीं, तसें तुला रुचलें नाहीं, ह्मणून आजचे दिवशीं चिंतेस पात्र झालास. सर्वदा आपलें हितच करितो अशा सेवकास जो सोडीत नाहीं सांभाळितो, त्यास आपत्तिकाळीं तो सेवक सोडीत नाहीं. एकवेळ सेवकांस दिलेली उपजीविका जो उणी करितो अथवा चालवीत नाहीं, त्यास ते ठक असा मानून त्याचें अनहित होईल तें करितात, ह्मणून पूर्वींच आपला आदाय व खर्च पाहून आपले हातून नित्य चालेल तितकें द्यावें. आपल्यास अनुकूळ आपलें कार्य तिडकेनें

करितात असें सहाय बाळगावें, कांकीं महादुर्घट काम असलें तरी ज्यास सहाय आहेत त्यास साध्य होतें. जो सेवक धन्याचें मनोगत समजून सर्व कार्यें आळस न करितां करितो, हित सांगतो, सर्वदा अनुकूळ, प्रमाणिक, धन्याची शक्ति जाणतो, अशास आपले जीवाप्रमाणें बाळगावा. जो सांगितलें काम ऐकत नाहीं, उन्मत्त-पणानें मी नाहीं करीत असें स्पष्ट बोलतो, तुजपेक्षां मी शहाणा असें धन्यास दर्शवून त्याचे बोलण्यास खोड-तो, अशा सेवकास सत्वर काढावा. जो निगर्वी १, धारिष्टवान् २, सांगितलें काम लवकर करितो ३, दया-ळू ४, मृदुभाषी ५, आपल्या धन्यास सोडून दुसऱ्यास कधींही वश होत नाहीं ६, जिव्हा स्वाधीन ह्मणून ज्यास रोगाची पीडा नाहीं ७, जो समयीं सुयुक्त बो-लणारा ८, असा आठ गुणांनीं युक्त जो तो उत्तम से-वक ह्मणावा. ज्याचा आपल्यास विश्वास नाहीं त्याचे घरीं रात्रौ कदापि जाऊंनये. रात्रौ कोणाचे अंगण्यांत घरधन्यास न कळत राहूं नये. राजानें इ-च्छिले स्त्रीची इच्छा करूंनये. बहुत जणांनीं घेऊन

एखादी गुजगोष्ट केली, ती आपणास रुचली नाहीं तर न रुचली असें त्यांस स्पष्ट न दाखवितां, कांहीं एक निमित्त करून आपण त्यांतून युक्तीनें निष्टून जावें.

इतक्यांशीं द्रव्याचा व्यवहार करूंनये. द्यायास न इच्छील तर नदेऊं शकेल ह्मणून राजाशीं १, आपलें तिचें एकचित्त आहे असें लोकांस वाटेल ह्मणून व्यभिच्यारिणी स्त्रीशीं २, राजास आपला ह्मणून अभिमान पडेल यासाठीं राज सेवकांशीं ३, माघारां घेण्याविषयीं बलात्कार करणार नाहीं ह्मणून पुत्र अथवा बंधूशीं ४, जिचा पुत्र लहान आहे आणि स्वतां विधवा अशे स्त्रीशीं, कां कीं उभयतांवर बलात्कार करूं शकत नाहीं ५, कांहीं दूषण ठेऊन राजानें ज्याचे कडून कारभार काढला आहे त्याशीं, कांकीं अशे पुरुषाची फिर्याद राजापाशीं नेली असतां राजा आपणाकडेस अन्याय लावील ६. हे दहा गुण प्रातःस्नान करणाराचे ठायीं राहतात; बळ १, रूप २, सुस्वरता ३, स्पष्टवर्णोच्चार ४, मवाळपणा ५, सुगंधता ६, निर्मळता ७, शोभा ८, सुकुमारता ९, व या सर्व गुणांस्तव उत्तम

स्त्रीप्राप्ति १०. हे सहागुण भूक ठेऊन जेवणाराचे ठायीं राहतात, आरोग्य १, आयुष्य २, बळ ३, सुख ४, चांगलें अपत्य ५, अधाशी ह्मणून लोक निंदित नाहींत ६. आपले भुकेचे चार भाग करून दोन भाग अन्न भक्षावें, एक भाग पाणी प्यावें आणि चौथा भाग वायु संचारासाठीं रिकामा ठेवावा, याचें नाव मित भोजन, यांत अन्यथा जाहलें तें रोगास कारण होतें. हे सात पुरुष घरांत ठेवूं नयेत; अकर्मी १, खादाड २, द्वेषी ३, महापातकी ४, घातकी ५, समयानुसार वर्तणूक जाणत नाहीं तो ६, नाना प्रकारचे वेष धरणारा तो ७. या नवांपाशीं संकटकाळींही याचना करूं नये; अदाता १; गाळी देणारा २, मूर्ख ३, रानटी ४, कपटी ५, नीचाची संगत करणारा ६, निर्दय ७, हटवैरी ८, कृतघ्न ९. हे सहानीच यांशीं कधींही गांठ पाडूं नये; कुकर्मी १, व्यग्रचित्त २, सदा लबाड ३, ज्याचें स्नेहाकडे लक्ष नाहीं ४, चंचळवृत्ति ५, आपणच शाहणा असें मानितो तो ६. दुसऱ्याचे साहित्यावांचून द्रव्यादिक अर्थप्राप्त होत

नाहींत तसेंच द्रव्यादिक अर्थावांचून दुसऱ्याचें साहित्य प्राप्त होत नाहीं, या दोहोंस एकमेकांची अपेक्षा आहे, एकावांचून एक सिद्ध होत नाहीं. यालोकीं जन्म घेऊन पुरुषानें काय करावें तें सांगतों; स्वस्त्रीपासून पुत्र उत्पन्न करावे, त्यांस विद्याभ्यास करवावा, ऋण न ठेऊन कांहीं उपजीविका करून द्यावी, कन्या असतील त्या चांगले स्थळीं द्याव्या, नंतर पुत्रांचे स्वाधीन संसार करून आपण अरण्यांत अथवा एकांतस्थळीं राहून निरंतर परमेश्वर भजनीं लागावें, तें भजन कसें ह्मणसील तर ज्यामध्यें प्राणिमात्राचें हित व जें केल्यानें आपल्या आत्म्यास सुख होतें, शरीरास कष्ट पडल्यास चिंता नाहीं, तें कर्म केवळ परमेश्वरप्रीत्यर्थ करावें; ह्मणजे त्यापासून आपणास अमुकफळ प्राप्त व्हावें ह्मणून सकाम करूं नये. असें जें कर्म दुसऱ्याचें व आपलें हित करणारें, हेंच परमेश्वराचें भजन आणि सर्वसिद्धींचें मूळ होय. दुसऱ्यास मित्र करून घेण्याविषयीं बुद्धि १, स्वयें निर्दोष ह्मणून शत्रूवर दाब २, सत्यादि गुणेंकरून ज्यास तेज ३, बळ ४,

उद्योग ५, निश्चय ६, हीं सहा ज्यास आहेत त्यास पोटाची काळजी नाहीं.

विदुर ह्मणतो हे राजा ! तूं आपलें घरांत कलह करून इतकें केलेंस; देवाची अवकृपा, आपलीं लेंकरें जे पांडव त्यांशीं वैर, आपल्यास नित्य चिंता, लोकांत अपकीर्ति, आणि शत्रूंस हर्ष. भीष्माचा कोप, तुझा कोप, द्रोणाचा कोप, व धर्मराजाचा कोप, हे चार थोरथोरांचे कोप वाढले असतां सर्व लोकांचा विध्वंस करूं शकतील, तर असें न होय तें करावें. हे राजा ! तुझे पुत्र शंभर, कर्ण, पांच पांडव, हे एक चित्तानें संपूर्ण समुद्रवलयांकित पृथ्वीचें पाळण करोत. तुझे पुत्र हे वन होत, त्यांत पांडव हे व्याघ्र होत, तस्मात् व्याघ्रांसहित वनाचा छेद करूं नको; पांडव व्याघ्रांवांचून तुझे पुत्ररूप वनाचा नाश होणार तो न होवो, कांकीं व्याघ्रांवांचून वन नाहीं, वनावांचून व्याघ्र नाहींत, व्याघ्रांची वस्ती आहे ह्मणून वन सुरक्षित आहे, वनामुळें व्याघ्र सुरक्षित आहेत.

दुष्टबुद्धीचे पुरुष दुसऱ्याचे सद्गुण जाणूं इच्छित

नाहींत, दोषांचा मात्र शोध ठेवितात; आणि सद्गुणांवर दाटून दोषारोप करितात. उत्कृष्ट पुरुषार्थ इच्छिणारानें आधीं स्वधर्म आचरावा, स्वधर्मास सोडून कोणतीही अर्थप्राप्ति नाहीं, जसें स्वर्ग लोकास सोडून अमृत नाहीं. ज्याचें चित्त पातकास कंटाळून ईश्वरीं लागलें त्याणें सर्व कांहीं जाणिलें. ज्याणें धर्म, अर्थ, काम, जसे सेवावे तसे सेविले, तो त्यांचें फळ यालोकीं आणि परलोकीं पावला. क्रोध, हर्ष यांचा वेग जो साहतो, ह्मणजे त्यांपासून विकार पावत नाहीं, आपत्तिकाळीं जो घाबरत नाहीं, तो लक्ष्मीचा कृपापात्र होतो. पुरुषास बळ पांच प्रकारचें, त्यांत बाहुबळ १, विचार देणारांचें बळ २, धनबळ ३, आप्तांचें ४, आणि बुद्धिबळ ५, यां सर्वांमध्यें बुद्धिबळ श्रेष्ठ. मोठा अपकार करायास शकतो अशा पुरुषाशीं वैर करून आपण त्यापासून दूर आहें, त्याचा उपद्रव होणार नाहीं असा विश्वास धरूं नये. स्त्री १, राजा २, सर्प ३, अध्ययन ४, आपला धनी ५, शत्रु ६, विषयभोग ७, आयुष्य ८, हीं माझीं आहेत ह्मणून शहाण्यानें यांज-

वर भरवसा कदापि धरूं नये. ज्याचे बुद्धीस विकार जाहला त्याची परीक्षा करायास वैद्य आहे, परंतु औषध नाहीं तेथें मंत्र, तंत्र, होम यांचाही उपाय नाहीं. सिंह १, सर्प २, अग्नि ३, आपली ज्ञाति ४, यांची अवगणना करूंनये कांकीं हे अति तेजस्वी होत. महातेजरूपी अग्नि काष्ठाचेठायीं गुप्त आहे तोंपर्यंत कांहीं वाटत नाहीं, तोच काष्ठघर्षणानें प्रगट जाहाल्यावर ज्या काष्ठांत राहिला त्यासुद्धां सर्व वन जाळितो; असेच आपले कुळाचेठायीं पांडव अग्निसारिखे तेजस्वी होत, क्षमावंत ह्मणून आपलें सामर्थ्य न समजूं देतां काष्ठांतल्या अग्निसारिखे राहिले आहेत.

हे राजा! तूं तुझ्या पुत्रांसहित वेलीरूप होस, आणि पांडव हे मोठे वृक्ष होत, ह्मणून वेली मोठ्या वृक्षाचा आश्रय केल्यावांचून वाढत नाहींत. तुझे पुत्र दुर्योधनादिक हें वन होय, या वनीं पांडव हे सिंह होत असें जाण. भ्रमांत पडूं नको; सिंहहीन वन नाशपावेल, वनावांचून सिंह नाश पावतील, ह्मणून परस्परांचा क्षय न व्हावा हें मला बरें दिसतें.

# विदुरनीति.

## अध्याय साहवा.

हे राजा ! कोणीही पाहुणा आपले घरीं आला असतां त्यास बसायास द्यावें, पाय धुवायाचे योग्यतेचा असेल त्याचे आपण स्वतां पाय धुवावे, नाहीं तर पाणी आणून द्यावें, कांहीं उपहारास द्यावें, नंतर त्याचें वर्तमान पुसावें, त्याणें पुशिलें असतां आपलें सांगावें, मग त्यास सत्कारपूर्वक भोजन घालावें. आपले घरीं आलेल्याचा ज्यापासून सत्कार होत नाहीं, जो लोभास्तव अथवा कृपणपणानें घरीं आलेल्यास कांहीं देत नाहीं त्याचें जिणें व्यर्थ; शास्त्र न पढोन स्वकल्पनेनें औषध देणारा वैद्य, हातेरें करणारा, शिनळ, चोर, क्रूर, दारुबाज, गर्भ पाडणारा, बंडावर पोट भरणारा, वेद विकणारा, हे उदक द्यावयासही योग्य नव्हेत, परंतु आपले दारीं जेवायाचे वेळेवर

आले असतां आपले जांवयासारिखा सत्कार करून त्यांस भोजनास घालावें.

बुद्धिमानाचें वाईट करून मी त्यापासून दूर आहें असें ह्मणूंनये, कांकीं बुद्धिमानाचे हात लांब असतात, विश्वास धरायास योग्य नाहीं त्याचा विश्वास धरूंनये; विश्वास धरावयास योग्य अशावरही फार विश्वास ठेवूंनये, कां ज्याजवर विश्वास ठेविला तो कदाचित् वैरी झाला असतां त्यास आपलीं सर्व वर्में कर्में ठावूक ह्मणून त्याचे हातून समूळ नाश होतो. स्त्री ही घराची लक्ष्मी होय, तिजविषयीं क्षमा असूं द्यावी, तिचें संरक्षण करावें, अन्नवस्त्रादिक यथायोग्य द्यावें, मधूर बोलावें, तिचे स्वाधीन मात्र होऊंनये. बापाकडे घरच्या स्त्रियांची चौकशी सांगावी, आईस स्वयंपाक घरचा बंदोबस्त सांगावा, आपले बरोबरीचे भाऊबंद यांस पशूंची चौकशी सांगावी, शेत अथवा दुकान तर आपण स्वयें सांभाळावें, पुत्राचे हातून ब्राह्मण सेवा करवावी.

ज्या राजाचें गुज जवळचे किंवा दूरचे यां कोणा-

लाही समजत नाहीं, जो सेवकांचे दृष्टीनें सर्वत्र पाहा-
तो, तो राजा बहुतकाळ ऐश्वर्य भोगितो. एकांत क-
रायासाठीं पर्वतावर जावें अथवा माडीवर जावें अथवा
अरण्यांत अथवा जेथें कोणी ऐकुं पावणार नाहीं
तेथें जावें. जो मित्र नाहीं तो आपलें गुह्य जाणा-
यास योग्य नाहीं, सुहृद् आहे परंतु शहाणा न-
व्हे, अथवा शहाणा आहे परंतु ज्याची जिव्हा
स्वाधीन नाहीं त्यास गुह्य सांगूंनये. परीक्षा केल्या-
वांचून प्रधान करूंनये, जो प्रधान अर्थ संपादन करा-
यास जाणतो, व गुह्य गुप्त राखितो, तोच त्या पदवीस
योग्य. ज्या राजाचीं सर्व कार्यें घडून आल्यापूर्वीं क
चेरीस बसणारेही जाणत नाहींत तो राजा राजांमध्यें
श्रेष्ठ, द्रव्यादिकाचे लोभानें जो पापकर्म करितो तो तीं
कार्यें न साधून कोणेएके समयीं जीवित्वापासूनही भ्रष्ट
होतो. पुण्यकर्में आपले हातून घडलीं असतां सुख दे
तात, न घडलीं असतां पश्चात्ताप करितात.

ज्या ब्राह्मणानें वेदाध्ययन केलें नाहीं तो जसा श्रा-
द्धास बसावयाचे उपयोगीं नाहीं, याच प्रकारें शत्रूशीं

वर्तणूक करण्याविषयीं ज्याला हे षड्गुण समजत नाहींत तो मसलतीस उपयोगी नाहीं. त्यांतील प्रथम गुण मैत्री १, विघाड २, चढून जाणें ३, ठाम असणें ४, फूटकरणें ५, दुसऱ्याचा आश्रय धरणें ६. आपली पूर्ववत् स्थिति आहे किंवा वृद्धि किंवा क्षय आहे हें ज्या राजास समजतें, जो मैत्री आदि षड्गुण जाणतो, ज्याचें शील चांगलें, त्याचे स्वाधीन राज्य राहातें. ज्याचे क्रोधानें शत्रु भितात, ज्याचे हर्षानें लोकांस लाभ होतो, आपले भांडाराची चौकशी वारंवार जो स्वतां करितो, त्यासच चहूंकडून द्रव्य मिळतें.

राजा ह्मणून आज्ञा मान्यकरून सर्व आपणास सेवितात, छत्र आपल्या डोईवर आहे इतक्यानेंच संतुष्ट असावें; संपत्ती सेवकादिकां करवीं भोगवावी, आपण एकट्यानेंच सर्व भोगूं नये. ब्राह्मणाचें स्वरूप ब्राह्मण जाणतो, स्त्रीचें स्वरूप भ्रतार जाणतो, प्रधानाचें स्वरूप राजा जाणतो, राजाचें स्वरूप राजा जाणतो.

वध करायास योग्य इतका अपराधी आणि आ-

पले हातीं सांपडला आहे, अशे शत्रूस आपले अंगीं बळकटी असल्यास मारावेंच; तो नीच होऊन आपली सेवा करायास सिद्ध आहे तथापि सोडूनये, सोडिला असतां त्यापासून लवकरच अपकार होईल, देव १, राजा २, ब्राह्मण ३, वृद्ध ४, बाळक ५, रोगी ६, यांजविषयीं क्रोध आला तरी सांवरावा. ज्यांत बरें निष्पन्न होणार नाहीं त्या कज्जांत मूर्ख जे तेच पडतात शहाणा पडत नाहीं, तेणेकरून त्यास लोक बरें ह्मणतात; आणि त्यास अनर्थ बाधत नाहींत.

या लोकीं अथवा परलोकीं जसें आपलें कर्म असेल तशी संपत्ति किंवा दरिद्र प्राप्त होतें; बुद्धिमानासच द्रव्य मिळतें, मंदबुद्धीस मिळत नाहीं असें नाहीं. विद्या, बरा स्वभाव, वय, द्रव्य, उत्तमकुळ, यांहीं करून जे थोर त्या सर्वांचा अवमान मूर्ख निरंतर करीत असतो. नीचकर्मी, मूर्ख, दोषदृष्टि, अधार्मिक, दुष्टवचनी, क्रोधी, अशा पुरुषांस अनर्थ लवकर प्राप्त होतात. मागतां मागतां कंटाळा दिल्यावांचून देणें, वचन पाळणें, यथायोग्य भाषण, हीं ज्यापाशीं आहेत,

त्या पुरुषास शत्रूही वश होतात. दुसऱ्यास वंचित नाहीं जो स्वतां परम सावध, उपकार जाणतो, बुद्धिमान्, सरळस्वभावाचा, असा जो पुरुष तो निर्द्रव्य असला तरी त्यास सेवक, मित्र इत्यादिक फुकट मिळतात. एकटाच संपत्ति भोगितो, दुष्ट, उपकार जाणत नाहीं, निर्लज्ज, असा राजा सोडावा. धैर्य १, क्रोध जिंकणें २, इंद्रियें जिंकणें ३, निर्मळता ४, करुणा ५, मृदु बोलणें ६, मित्रांशीं तूट नकरणें ७, हीं सात सर्व लोकांत ऐश्वर्याची प्रसिद्धी करणारीं होत. आपले जवळ नेहमी राहाणारा, निर्दोषी अशामनुष्यास जो छळितो, त्यास सर्प घरांत असतां जशी नीज येत नाहीं, तशी रात्रौ नीज येत नाहीं.

जें द्रव्य स्त्रियांचे हातीं गेलें, उन्मत्ताचे हातीं, अथवा पतिताचे हातीं, अथवा मूर्खाचे हातीं गेलें, तें निःसंशय गेलें असेंच जाणावें. जेथें स्त्रियांचें प्राबल्य आहे, जेथें कपट्याशीं प्रसंग, जेथें पोरबुद्धि राजा आहे, त्या खटल्यांत जे लोक राहतात, ते दगडाचे नावेंत बसून जाणारे नदींत जसे बुडतात, तसे बुडतात.

ज्याचे हातून आपलीं कार्यें होतात, त्याचे गुणदोषावर लक्ष ठेवीत नाहींत ते शहाणे, कां तसें लक्ष ठेविल्यानें कार्यांचा नाश होतो. ज्याची प्रशंसा, कपटी अथवा भाट अथवा शिनळ स्त्रिया करितात, तो पुरुष फार दिवस वांचत नाहीं.

हे राजा ! ज्यांचें तेज अपरिमित, ज्यांचीं धनुष्यें मोठीं, बाण ज्यांचे अति तिखट, अशा पांडवांस सोडून तूं दुर्योधनाचेठायीं ऐश्वर्यभार ठेविला आहेस, परंतु त्या ऐश्वर्यापासून भ्रष्ट झाला असा, तूं त्यास सत्वरच पाहशील, जसा ऐश्वर्यमदानें धुंद झालेला बळी त्रैलोक्याचे राज्यापासून भ्रष्ट जाहला.

# विदुरनीति.

## अध्याय सातवा.

धृतराष्ट्र ह्मणतो हे विदुरा ! मनुष्य हा कांहीं एक करण्याविषयीं समर्थ नाहीं, लांकडाची बाहुली जसी

दोरी हालविणाराचे स्वाधीन, तसा तो ईश्वरी सत्तेचे स्वाधीन आहे, तस्मात् तूं बोलणार तें बोल मी ऐकतो. विदुर बोलतो राजा, बोलूंनये त्यासमयीं बृहस्पतीही बोलला असतां अज्ञानत्व पावून त्याचा अवमान होतो, मग आमची कथा काय ? तर तूं बोलवितोस ह्मणून बोलतों ऐक. द्रव्य ज्यापासून मिळतें तो एक प्रिय वाटतो, अथवा गोड बोलतो तो प्रिय, अथवा बुद्धि सांगतो तो प्रिय, अथवा आश्रय देतो तो प्रिय, तेंच यांणीं न केलें असतां अप्रिय होतात ह्मणून त्यांस प्रिय ह्मणूं नये; कां जो प्रिय तो प्रियच कदापि अप्रिय होत नाहीं, जो आपणास आवडत नाहीं, त्याचेठायीं सद्गुण असले तरी दुर्गुणसे दिसतात आणि ज्यावर आपली प्रीति त्याचे दुर्गुणही सद्गुणसे वाटतात.

दुर्योधन जन्मला तेकाळींच तुला मी सांगितलें कीं या एका पुत्राचा त्याग केल्यानें तुझे शंभर पुत्रांचें कल्याण होईल, नाहीं तर नाश आहे, तें ऐकिलें नाहींस. ज्या गोष्टीनें बहुत हानि होत्ये ती गोष्ट ऐकूं नये, परंतु ज्या गोष्टीने अल्प हानि होऊन बहुत

लाभ होतो. ती हानि हानि असें ह्मणूं नये; तर हानि तीच कीं ज्यांत अल्प लाभ आणि फार नाश. कित्येक द्रव्यानें परिपूर्ण असतात, कित्येक गुणांनीं परिपूर्ण असतात. जे द्रव्यानें परिपूर्ण परंतु गुणी नव्हत, त्या पुरुषांस त्यागावें. सर्व गुणेंकरून संपन्न, नम्रतेनेंयुक्त, तो कधींही प्राणिमात्राचा नाश करायास इच्छित नाहीं.

दुसऱ्यावर आळ घालण्याविषयीं ज्यांची वासना, दुसऱ्याचें दुःख पाहून ज्यांस बरें वाटतें, जे एकमेकांशीं विरोध लावणारे, त्यांस निरंतर ते उद्योग करावेसे वाटतात. ज्यांचें दर्शन घेतलें असतां प्रशस्त नव्हे, ज्यांचे संगतीं राहिलें असतां मोठें भय, ज्यांपासून द्रव्य घेतलें असतां मोठा दोष, दिलें असतां मोठी चिंता उत्पन्न होती, जे एकमेकांमध्यें तूट करणारे, जे लोभी, निर्लज्ज,शठ, पातकी, आणखीही मोठे मोठे दोष आचरण करणारे, त्यां मनुष्यांस मैत्रीविषयीं वर्ज करावे; कांकीं अशांची मैत्री सुटली असतां आपण केलेली प्रीति किंवा उपकार अथवा इष्टत्वांतलें सुख,

हीं फुकट जाऊन ते उलटी आपली निंदा करण्यास प्रवर्ततात, आणि आपला नाश होईल तो उद्योग करितात. ह्मणून उत्तमाशीं मैत्री करावी, कीं त्याशीं बिघडलें असतांही आपल्यास त्याजपासून अपकार होणार नाहीं. थोडाही अन्याय झाला तरी जो क्षमा करीत नाहीं, असा जो नीच, क्रूर, कुमनुष्य, त्यापासून बुद्धिमानानें फार दूर रहावें.

आपले भाऊबंदांतील कोणी दरिद्री, दीन, रोगी आहे, त्यावर जो कृपा करितो त्याची संतति संपत्ति वाढते, आणि त्यास बहुत सुख प्राप्त होतें. जे आपलें कल्याण व वृद्धि इच्छितात, त्यांहीं आपलें गोत्र वाढवावें. ह्मणून हे राजा ! कुळाची वृद्धि कर, मारबूं नको. हे राजा ! पांडव परम शूर आहेत त्यांवर कृपा ठेव, उदरपोषणाकरितां त्यांस कांहीं गांव दे, असें केल्यानें लोक तुला बरें ह्मणतील. बापा ! आपले भाउबंदां बरोबर विरोध करूंनये. जो आपलें बरें इच्छितो, त्याणें सुखें भोगणें तीं भाऊबंदां सहवर्तमान भोगावीं; भोजन किंवा गोष्टी किंवा प्रीति हीं परस्पर त्यांजबरोबर करावीं, विरोध कदापि करूं न;

ये. त्यांशीं बरें असल्यास ते तारितात, नाहीं तर तेच बुडवितात. तस्मात् पांडवांशीं बरेपणा राख, ह्मणजे तूं शत्रूंस अजिक्य होशील. आपण श्रीमंत ह्मणून आपले कुटुंबांतील कोणी आपले जवळ आला असतां, आपणास सामर्थ्य असून त्याचे क्लेश दूर न केले तर पातक लागतें.

पांडवांस तुझे पुत्रांनीं मारिलें अथवा तुझे पुत्रांस पांडवांनीं मारिलें तथापि दोहींकडून तुला पश्चात्ताप होईल; कां दोन्हीं गोत्रज ह्मणून याचा विचार कर. पुढें एकल्यानें खाटल्यावर बसून संताप करावा हें फार वाईट. अन्याय सर्वांपासून होतात, जर पश्चात्ताप करून या पुढें सावध होशील, तर आजपर्यंत तुझ्यापासून झाले अन्याय धुवून जातील, ज्यांचा अपराध केला त्यांनीं संतुष्ट होऊन क्षमा केली असतां त्या दोषापासून सुटका होती. सुज्ञांनीं उपदेश केलेले गोष्टीचा जो त्या त्या प्रसंगीं अनुभव घेतो, त्याचें पाऊल वांकडें पडत नाहीं.

ज्या कर्मांत पातक होणार हें समजून जो तें कर्म

आरंभित नाहीं तो वाढतो, जो मागें केलेल्या पापकर्मा- च्या विचार न करून पुढें तशींच करीत जातो, तो दु- ष्टबुद्धि घोर नरकांत पडतो. मद्यपान १, निद्रा २, आशींपाशीं कोणी ऐकेल त्याची चौकशी न ठेवणें ३, मुखच्छाया ४, दुष्टावरविश्वास ५, अनाडीसेवक ६, या सहा द्वारांनीं गुह्यगोष्ट फुटते; तर या सहा द्वारां- स जो जपतो, धर्मार्थकामीं लक्ष ठेवितो, आणि यु- द्धीं सावध राहतो, तो शत्रुपेक्षां वरचढ होतो. शास्त्र जाणल्यावांचून आणि आपणाहून थोर जे त्यांची से- वा केल्यावांचून आपलें हित समजत नाहीं. समुद्रां- त पडलें तें फुकट गेलें १, सांगितलेलें करीत नाहीं त्या- चे कानांत पडलें तें फुकट गेलें २, जडबुद्धीस सांगित- लें शास्त्र फुकट गेलें ३, अग्निहोत्रावांचून होमिलें तें फुकट गेलें ४, शाहाण्यानें पूर्वीं पुढील परीक्षा करून मग दुसऱ्याशीं मैत्री करावी. कुळ, शीळ आपल्या अनुभवास तो कसा येतो तें, त्यास लोक काय ह्मण- तात तें, त्याची आकृति प्रत्यक्ष पाहावी. त्याचें शा-

हाणपण पाहावें, आणि मग त्याशीं मैत्री करावी.

नम्रता अपकीर्तीचा नाश करिते, पराक्रम अनर्थाचा नाश करितो, क्षमा क्रोधाचा नाश करिती, धर्माचरण दुर्लक्षणाचा नाश करितें. कुळाची परीक्षा करणें तर उपजीविकेचें साधन, ठावठीकाण, घरदार, आचरण, वस्त्रपात्र इतकें पाहावें. बळात्कारानें मनांत उत्पन्न जाहाला एखदा दुष्ट मनोरथ त्याचा तिरस्कार होणे हें संन्याशासही कठीण आहे, मग गृहस्थाची कथा काय ! असें असतांही जो मन आवरतो तो धन्य होय.

थोरथोरांची संगत करितो, जो विद्वान, धार्मिक, हास्यमुख, बहुत इष्टमित्र ज्यास आहेत, मधुर ज्याचें वाक्य, हृदय ज्याचें निर्मळ, अशा इष्टावर अत्यंत प्रीति करीत असावी. उत्तम कुळांतला अथवा वाईट कुळांतला असो, जो थोरांची मर्यादा उल्लंघित नाहीं, स्वधर्मावर वासना ज्याची, जो नम्र, सद्बुद्धिमान, तो शंभर नावांचे कुलीनापेक्षां श्रेष्ठ होय. ज्या दोघांचें आचरण समान, निश्चिती समान, ज्ञान समान, त्यांची

परस्पर मैत्री फार दिवस चालते. दुर्बुद्धि, अडाणी असा जो तो मित्रत्वाविषयीं टाकावा, जशी गवतानें झांकलेली विहीर तसा तो,त्याचेठायीं मित्रत्वाचा नाश होईल; तसाच भ्रष्ट, मूर्ख, कोपी, अविचारी अधर्मी, यांशीं मैत्री करूं नये.

केलेले उपकार जाणतो, धार्मिक, सत्यवादी, जो मनाचा हालका नव्हे, ज्याचा स्नेह दृढ, ज्यास इंद्रियें वश, असा जो मित्र त्यास कदापि सोडूंनये. इंद्रियांचे हातून विषय सोडिवणें हें परम कठीण, एकवेळ सोडिवलें असतां पुनः विषयांवर इंद्रियांची प्रीति करिवणें यासारखें लाजिरवाणें दुसरें नाहीं. सर्व प्राणिमात्रांशी नम्रता धरणें १, दुसऱ्यास दोष न ठेवणें २,क्षमा ३, धीर ४, आणि मित्राचा अपमान न करणें ५, हीं आयुष्याची वृद्धि करणारीं होत. कुमार्गानें किती द्रव्य गेलें हें पाहून जो सावध होतो,आणि पुढें उरलेलें बरी वहिवाट करून राखूं इच्छितो, तो शाहाणा समजावा. जें दुःख पुढें होणार त्याचा आजपासून उपाय मांडितो, सांप्रत जें होतें आहे तें भोगिल्यावांचून सरणार नाहीं हें जा-

णून जो वर्तती, मागें जें भोगलें त्याचा अनुभव जो विसरत नाहीं, असा जो मनुष्य त्याचीं सर्व कार्यें साधताहेत.

काया, वाचा, मन, यांचा ज्या ज्या कर्मावर निरंतर भर पडतो, तें तें पुरुषास साध्य होतें; ह्मणून सदा पुण्यकर्मीं आवडी असो द्यावी. मंगलपदार्थांस स्पर्श करणें १, सहायांची अनुकूळता २, शास्त्रज्ञान ३, उद्योग ४, सर्वांशी सरळपणा ५, साधुसमागम ६, हीं सहा थोरपणा देणारीं होत. निरंतर उद्योगी जो त्यास धनलाभ आणि कल्याण हीं प्राप्त होताहेत, आणि तो सुख पावतो. क्षमेहून हितकर्ता, अथवा लक्ष्मी देणारा, असा दुसरा पदार्थ नाहीं, आपली वृद्धि जो इच्छितो त्याणें क्षमा धरावी. ज्यांत स्वधर्म आणि स्वार्थ यांची हानि होत नाहीं, तें सुख हावें तितकें भोगावें, नेमावरच फार भर ठेवूंनये, ह्मणजे खायाचे पदार्थ अथवा स्वस्त्रीभोग आदिकरून जें शास्त्राज्ञेनें प्रशस्त आहे, त्यावर आपली दृढवासना असल्यास आग्रह धरून जीव आटवूंनये. कां वासना राहील

तर जीव आटवूंन फळ काय ? दुःखानें पीडिलेले, उन्मत्त, नास्तिक, आळशी, इंद्रियें ज्यांस दमवितां येत नाहींत. उत्साह रहित त्यांजपाशी लक्ष्मी राहत नाहीं सर्वांशी जो नीट, सर्वांचा ज्यास संकोच, त्यास अशक्त असें मानून दुष्ट जे तेच उपद्रव करितात. अत्यंत गुणवान्, उत्कृष्टदाता, अतिशूर, अत्यंत प्रमाणिक, अत्यंतशाहाणा, यांजवळ लक्ष्मी राहात नाहीं, ह्मणजे गुणाहून लक्ष्मी थोर असें न वाटून ते द्रव्याचा व्यय करीत असतात. लक्ष्मी आंधळी आहे, अत्यंत गुणवानापाशी अथवा अत्यंत निर्गुण्यापाशी राहते असा नेम नाहीं, कोठेही राहाते. वेदाध्ययनाचें फळ हेंच कीं घरीं अग्निहोत्र असावें, शास्त्र पढल्याचें फळ हेंच कीं सद्गुण लागावे, स्त्रीचें फळ हेंच कीं संभोग आणि पुत्र प्राप्ती, धनाचें फळ हेंच कीं त्याग आणि भोग हीं व्हावी. अधर्मानें मेळविले द्रव्यानें परलोकसाधनाविषयीं जो यज्ञदानादिक करितो, तो मेला असतां त्या यज्ञदानादिकांचें फळ परलोकीं त्यास मिळत नाहीं, कां कीं तें अधर्माचें द्रव्य ह्मणून अवघडमार्गीं,

वनांत, दुर्गांत, विपत्तिमध्यें, कोणी घाबरें केलें असतां, अथवा मारायास शस्त्र उपसलें असतां सत्यशीळास भय उत्पन्न होत नाहीं. आपला बोज राखणें, इंद्रियदमन, चौकसपणा, उन्मत्त न होणें, धैर्य, स्मरण, कोणतीही गोष्ट विचार करून आरंभणें, हीं थोरपणाचीं करणें होत.

तापसाचें बळ तप १, ब्रह्मवेत्त्याचें बळ वेद २, असाधूचें बळ हिंसा ३, गुणवानाचें बळ क्षमा ४, ह्मणून उदक १, मूळ २, फळ ३, दूध ४, होमद्रव्य ५, थोर ब्राह्मणांची आज्ञा ६, गुरूचें वचन ७, औषध ८, हीं आठ सेविलीं असतां व्रताचा भंग होत नाहीं. आपला जीव तसा दुसऱ्याचा, आपणास वाईट तें दुसऱ्यास वाईट, हें जाणून जो वर्तता त्याणें सर्व धर्माचें सार जाणिलें असें समजावें. शांतीनें क्रोधास जिंकावें, साधुपणानें असाधूस जिंकावें, दानानें कृपणास जिंकावें, सत्यानें असत्यास जिंकावें. यां नवांचे ठायीं विश्वास ठेवूंनये. स्त्री १, शिनळपुरुष २, आळशी ३, भ्याड ४, फारक्रोधी ५, अहंमानी ६, चोर ७, कृ-

तग्न ८, नास्तिक ९. सर्वदा जो नम्र, वडिलांची सेवा करितो, त्याची कीर्ति १, आयुष्य २, यश ३, बळ ४, हीं चार वाढताहेत.

हे राजा ! अत्यंत क्लेशानें अथवा अधर्मानें अथवा शत्रूस शरण जाऊन द्रव्य मिळवणें, हें तुजपासून न होऊं, निरक्षरी पुरुष, वांझ बायको, मुलें असून त्यांस खायास मिळत नाहीं, राजावांचून राज्य या सर्व गोष्टी शोक करवितात. नित्य मार्गक्रमणानें मनुष्य तुटतो, बैठा ठेविल्यानें घोडा तुटतो, उदकाचे झऱ्यांनीं पर्वत तुटतो, पुरुषाचे वियोगानें बायको तुटते दुर्वचनानें मन तुटतें, ह्मणजे दुर्वचनें बोलल्यानंतर पश्चात्ताप होऊन मन व्यथा पावतें. अनभ्यास हा वेदशास्त्रांस मळ होय. व्रतें, नेम न करणें हा ब्राह्मणास मळ होय, उखरभूमी हा पृथ्वीचा मळ होय, असत्य बोलणें हा मनुष्यास मळ होय, पतिव्रतेस नाच, तमाशा पाहणें हा मळ होय, बायकांस प्रवास करणें हा मळ होय, सोन्यास रुपें हा मळ होय, रुप्यास कथील हा मळ होय, कथिलास शिसें हा मळ

होय, शिशास माती हा मळ होय. निद्रेनें निद्रेची तृप्ति करूं लागूंनये. स्त्रीसंभोगानें स्त्रीविषयाची तृप्ति करूं लागूंनये, सर्पण घालून अग्नीची तृप्ति करूं लागूंनये, मद्य पिऊन मद्यपानाची तृप्ति करूं लागूंनये.

ज्याणें देऊन घेऊन मित्र जिंकिला, युद्धकरून शत्रु जिंकिला, अन्नवस्त्रांची यथास्थित सोय करून स्त्री जिंकिली, त्याचें जीवित्व सफळ; ज्यांपाशी हजारों रुपये आहेत ते उपाशी मरत नाहींत; ज्यांपाशी शेंकडो आहेत तेही पोट भरितात; ज्यांपाशी कांहीं नाहीं त्यांचेंही ईश्वर चालिवतो. तस्मात् धृतराष्ट्रा ! तूं अधिक इच्छा सोड, जें देव देईल त्यांत संतुष्ट अस, कांकीं सृष्टीवर जितकें धन, धान्य पशु आदिकरून आहे, तें सर्व एकास मिळालें असतांही पुरेसें होणार नाहीं, हें ज्यास खरेखरें समजतें तो मोह पावत नाहीं.

हे राजा ! पुनःपुनः तुला सांगतों पांडव कौरव तुला समान असतील तर उभयतांवर समकृपा ठेऊन पांडवांचा राज्यविभाग पांडवांस दे, तुझें कल्याण होईल.

# विदुरनीति.

## अध्याय आठवा.

विदुर ह्मणतो हे धृतराष्ट्रा ! साधु ज्याचा सत्कार करितात, जो अभिमानरहित, जो आपली शक्ति पाहून कोणतेंही काम आरंभितो, तो लवकरच साधु होतो, साधुपणाचे पोटीं बहुत सुख पावतो. मोठाही लाभ होत आहे परंतु जर तो अधर्मयुक्त आहे, तर त्याजकडे जो पाहत नाहीं, तो पुरुष दुःखें टाकून सुखी राहतो; जसा मेंग टाकून सर्प सुखी राहतो. खोटें संपादून जय मिळवणें, राजापाशी चहाडी सांगून उपद्रव करणें, गुरु अथवा वडील यांशी मतारणा करणें, हीं ब्रह्महत्येसमान होत.

दुसऱ्यास वाईट दृष्टीनें पाहाणें आणि आपले मृत्यूस लवकर बोलावणें, हीं दोन वेगळीं नाहींत; अतिवाद सांगणें आणि द्रव्याचा नाश करणें हीं दोन्ही एकच. गुरुसेवा न करणें, थोड्या दिवसांनीं पुष्कळ

विद्या इच्छिणें, तसेंच थोडे विद्येनें पुष्कळ येतें असा आव घालणें, हीं तीन विद्येचे शत्रु होत. विद्या इच्छिणारांनीं हे सात दुर्गुण सोडावे; आळस १, गर्व २, चंचळवृत्ति ३, गोष्टी ४, दांडगेपणा ५, मान ६, लोभीपणा ७, सुख इच्छिणारास विद्या कोठून होणार ! विद्यार्थ्यास सुख कोठचें ! ह्मणून सुखार्थी याणें विद्या सोडावी, विद्यार्थी याणें सुख सोडावें, सुख आणि विद्याभ्यास हीं दोन एकत्र नाहींत. लांकडांनीं अग्नि तृप्त होत नाहीं, नद्यानीं समुद्र तृप्त होत नाहीं, सर्व प्राणिमात्रांनीं मृत्यु तृप्त होत नाहीं, पुरुषांनीं शिनळ स्त्री तृप्त होत नाहीं. आशा धैर्यास नाशिते, काळ पदार्थमात्रास नाशितो; क्रोध लक्ष्मीस नाशितो, कृपणता कीर्त्तीस नाशिते, अपालन पशूंस नाशितें. बापा ! सर्व पुण्यकर्मांमध्यें श्रेष्ठ असें एक तुला सांगतों हें दृढ मनांत धर कीं, कामास्तव, लोभास्तव, अथवा जीवितास्तव, धर्म सोडूं नको. अधर्मास कधीं जय नाहीं. धर्म हा नित्य होय, सुख, दुःखें हीं येतात जातात, जीव नित्य आहे, जीवाचें कारण अविद्या ती

अनित्य, ह्मणून जीं अनित्य तीं तूं सोड आणि कधींही नाश नाहीं ज्यास असें जें नित्य वस्तु परमेश्वर त्याचेठायीं निष्ठा ठेऊन संतोष पाव.

सर्व लाभामध्यें संतोष हाच थोर लाभ आहे, कां मोठे मोठे बलाढ्य, पराक्रमी असे राजे धनधान्यानें पूर्ण अशा सकल पृथ्वीचें पालन करून सकल विषय भोगून संतोष न पावतां शेवटीं सर्व टाकून काळाचे स्वाधीन झाले; या मृत्युलोकची वस्ती अशी आहे. बहुत क्लेश भोगून वाढविला असा आपले प्रीतीचा पुत्र मेला असतां दीनवाणी रडतात, मग निरुपाय होऊन त्यास उचलून लवकर घरांतून बाहेर काढून लांकडासारिखा रचून जाळितात, राख झाली ह्मणजे सोयरीं धायरीं इष्टमित्र निराश होऊन मागें येतात. मेलेल्याचें शरीर आग अथवा किडे अथवा पक्षी हे खातात, द्रव्य दुसरा भोगितो, पुण्य किंवा पाप हीं दोन मात्र त्याचे संगतीं जातात, तस्मात् पुण्याचा ठेवा जोडून बरोबर न्यावा हें बरें आहे. या मृत्युलोकाचे वर स्वर्ग जसा आहे तसाच खालीं नरक आहे; ह्मणून हे

राजा ! माझी इच्छा हीच कीं, तो नरक तुला स्पर्श न करो. हा माझा उपदेश ऐकशील तर या लोकीं यश पावशील, आणि एथें व परलोकीं तुला भय होणार नाहीं. जीवित ही कोणीएक नदी होय, तिचे ठायीं धर्म हें तीर्थ, सत्य हें उदक, धैर्य हीं तटें, दया ह्याच लहरी; अशा नदींत स्नान केला तो पवित्र झाला. जो सदा निर्लोभी तोच पुण्यवान् जाणावा.

हे राजा ! कामक्रोधादिक आहेत सुसर जीमध्यें; श्रोत्र, त्वक्, चक्षु, जिव्हा, घ्राण, हें पंचेंद्रियरूप जल आहे जीमध्यें; जी अशी संसारनदी इचेठायीं धैर्यरूप नौका करून जन्म मृत्यु तरून जा. बुद्धीनें वडील धर्मानें वडील, विद्येनें वडील वयानें वडील, असा जो आपला भाऊबंद त्यास संतुष्ट ठेऊन बरें वाईट करणें न करणें जो पुसतो तो कधींही ठकत नाहीं. धैर्य दृढ करून स्त्री, विषय आणि जिव्हा यांजपासून आपणास राखावें, डोळे सावध ठेऊन हात पायांस राखावें, मन सावध ठेऊन कान डोळयांस राखवें, नेमावर आणून मन आणि वाचा हीं राखावीं. जो यथा-

काळीं स्नानसंध्यादिक करितो, वेदशास्त्राध्ययन करितो, दोष्याचें अन्न खात नाहीं, सत्य बोलतो, सत्कर्म करितो, असा जो ब्राह्मण तो ब्रह्मलोकीं जातो. जो वेदाध्ययन, अग्निहोत्र, यज्ञयागादिक कर्में, प्रजापालन, गोब्राह्मणपालन करितो, युद्धीं शूर, असा जो क्षत्रिय तो स्वर्गीं जातो. अध्ययनकरून ब्राह्मण, क्षत्रिय, आश्रित, यांस द्रव्य विभागून देतो; यज्ञयागादिक पुण्यकर्में करितो, तो वैश्य मेला असतां स्वर्गीं दिव्य सुखें भोगितो. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य यांची यथायोग्य सेवा करितो, असा जो शूद्र तो निष्पाप होऊन देह सोडिल्यावर स्वर्ग सुखें भोगितो.

हा चहूंवर्णांचा धर्म राजा तुला सांगितला याचें कारण सांगतों ऐक, राज्यावांचून पांडवांचे हातून क्षत्रियधर्म होणार नाहीं; ह्मणून त्यांस राजनीतीप्रमाणें द्यावयास योग्य आहे तें राज्य देऊन त्यांचा स्वधर्म राख, यांत तुझे सर्व मनोरथ पूर्ण होऊन शेवटीं जें नित्य, ज्यास वीट नाहीं, जें पावून जन्ममृत्यूंच्या येरझारा टळतात असें जें सुख तें पावशील.

याप्रकारें महाबुद्धिमान् परमसाधु पुण्यकीर्ति विदुर, धृतराष्ट्रराजास राजधर्म, राजनीति सांगता जाहाला. ती भारतामध्यें उद्योगपर्वीं तेहतिसापासून चाळीस अध्यायपर्यंत श्रीवेदव्यासानें संक्षेपें वर्णिली; त्यांतील आशय घेऊन महाराष्ट्र भाषेंत हा ग्रंथ केला आहे. ही नीति नित्य वाचून किंवा ऐकून एके एके गोष्टीचा अनुभव जो घेईल त्याचे सर्व दोष जातील, अनर्थ टळतील, दुःख जाऊन सुखी होईल, त्यास संकटें प्राप्त होणार नाहींत; काम, क्रोध, लोभाची पीडा होणार नाहीं, लोकांमध्यें मान्यता वाढेल, लक्ष्मी प्राप्त होईल, सदासर्वकाळ चित्तवृत्ति स्वच्छ राहतील, मृत्युपासून भय वाटणार नाहीं, मग त्रैलोक्याचा स्वामी जो परम कृपाळु जो सर्व मनोरथांचा पूर्णकर्त्ता तो ईश्वर सखा होऊन अंतकाळीं त्यास आपल्या निजधामास नेईल.

विदुरनीति अध्याय आठवा.

संपूर्ण.

श्री

# यक्षप्रश्न.

---

वैशंपायनऋषि जन्मेजयराजास सांगतो, कोणे ए-केसमयीं धर्म, भीम, अर्जुन, नकुळ, सहदेव, हे पांच पांडव द्वैतवनीं राहात असतां, एक ब्राह्मण येऊन त्यास बोलिला, हे महाराज ! माझ्या अग्निहोत्राच्या अरणी ह्मणजे विस्तव पाडायाचीं लांकडें वृक्षावर ठेविल्या होत्या त्या एक मृग घेऊन पळाला; त्याचा शोध करून अरणी मला आणून द्याव्या; नाहीं तर अग्निहोत्राचा भंग होतो. असें ब्राह्मणाचें वचन कानांत पडतांच पांचही पांडवांनीं धनुष्यबाण घेऊन सर्व रान शोधिलें; परंतु मृगाचें ठिकाण लागलें नाहीं; आणि भूक ताहानेनें बहुत पीडित होउन एक्या वडाच्या वृक्षाखालीं बसले असतां धर्मराजा बोलतो. नकुळा !

तृषेनें प्राण व्याकुळ जाहालारे ! कोठून तरी पाणी आण. तें ऐकून नकुळ एके उंच वृक्षावर चढला आणि पाहातो तों दूर पाण्याचें तळें दृष्टीस पडलें. मग त्या संधानानें तेथें जाऊन पाण्यास शिवतांच वृक्षावरून शब्द झाला अरेरे ! माझे प्रश्न आधीं सांग, मग पाणी पी; नसांगतां पिशील तर मरशील. तें भाषण न मानून पाणी पितांच नकुळ अचेतन पडला. त्याचे शोधास धर्मानें भीम पाठविला, असेच अर्जुन, सहदेव एकएकाच्या शोधास पाठविले, ते चारही पाणी पिऊन मूर्छित पडले असतां, धर्मराजानें फार वेळ वाट पाहिली, बंधू येत नाहींत ह्मणून चिंताग्रस्त होऊन अरण्य शोधीत शोधीत त्या उदकाजवळ गेला तों चौघेही बंधू तेथें अचेतन पडलेले पाहून फार दुःख करूं लागला. इतक्यांत वृक्षावरून वाणी जाहली कीं, अरे या स्थळाचा स्वामी मी यक्ष आहें, तुझे बंधू मी मारिले, आतां जर तूं माझ्या प्रश्नांचीं उत्तरें सांगशील तर दैवयोगानें पुनः ते जिवंत होतील; नाहीं तर माझी आज्ञा मोडून उदक प्यालास तर त्यांसारिखी तुझीही

दशा होईल. अशीं वचनें ऐकून धर्मराज बोलतो, यक्षा ! तुझे कसकसे प्रश्न आहेत ते बोल मी यथाज्ञानें सांगतों, हें ऐकून यक्ष प्रश्न करितो आणि धर्मराज उत्तर देतो.

---

प्रश्न ब्राह्मणास मोठेपणा कशानें मिळतो ?
उत्तर वेदशास्त्र जाणिल्यानें १.

प्र० इच्छिलें फळ कशानें मिळतें ? उ० तपानें २.

प्र० सुकीर्ति कशानें मिळते ? उ० इंद्रियें स्वाधीन केल्यानें ३.

प्र० सुबुद्धि कशानें होते ? उ० वडिलांची सेवा केल्यानें ४.

प्र० ब्राह्मणास दैवत कोण ? उ० वेद ५.

प्र० त्यांचा परंपरागत धर्म कोण ? उ० तपश्चर्या ६.

प्र० त्यांस मरण कोणतें ? उ० देहादिकाचे ठायीं दृढाभिमान ७.

प्र० त्यांस पाप कोणतें ? उ० दुसऱ्याचा दोष बोलणें ८.

प्र० क्षत्रियांस दैवत कोण? उ० धनुष्यबाण ९.

प्र० त्यांचा परंपरागत धर्म कोण? उ० यज्ञादिक करणें १०.

प्र० त्यांस मरण कोणतें? उ० युद्धांत भय पावणें किंवा पळणें ११.

प्र० त्यांस पाप कोणतें? उ० शरणांगताचें रक्षण न करणें १२.

प्र० जळांमध्यें उत्तम जळ कोणतें? उ० पर्जन्याचें १३.

प्र० थोडें पेरून पुष्कळ होतें काय? उ० धान्य आणि याचकास दिलेलें १४.

प्र० फळांमध्यें फळ कोणतें? उ० सुपुत्रफळ १५.

प्र० जीवंत असून मेलेला कोण? उ० मूर्ख अथवा ज्याचें शरीर कधींही परोपकारीं पडलें नाहीं तो १६.

प्र० पृथ्वीपेक्षां थोर कोण? उ० आई १७.

प्र० आकाशापेक्षां उंच कोण? उ० बाप १८.

प्र० वायुपेक्षां चपळ कोण? उ० मन १९.

प्र० तृणापेक्षां अधिक अंकुर येऊन वाढतें कोण ? उ० चिंता २०.

प्र० हृदय नाहीं कोणास ? उ० दगडास २१.

प्र० आपल्या वेगानें वाढते कोण ? उ० नदी २२.

प्र० कुटुंबवत्सलास मित्र कोण ? उ० द्रव्य २३.

प्र० गृहस्थास मित्र कोण ? उ० भार्या २४.

प्र० रोग्यास मित्र कोण ? उ० औषध २५.

प्र० मरणास मित्र कोण ? उ० दान, धर्म २६.

प्र० लोकीं अमृत कोणतें ? उ० दूध २७.

प्र० थंडीस औषध कोणतें ? उ० अग्नि २८.

प्र० सर्वांस स्थान कोणतें ? उ० पृथ्वी २९.

प्र० धर्माचें मुख्य स्थान कोणतें ? उ० दक्षता ३०.

प्र० यशाचें मुख्यस्थान कोणतें ? उ० दान ३१.

प्र० स्वर्गाचें मुख्यस्थान कोणतें ? उ० सत्य ३२.

प्र० सुखाचें मुख्यस्थान कोणतें ? उ० सदाचरण ३३.

प्र० मनुष्यास आत्मा कोण ? उ० पुत्र ३४.

प्र० दैवानें केलेला सखा कोण ? उ० भार्या ३५.

प्र० उपजीवन कोणतें ? उ० पर्जन्य ३६.

प्र० सर्वांस रक्षिता कोण ? उ० द्रव्यत्याग ३७.

प्र० धन्य जे त्यांमध्यें उत्तम कोण ? उ० परोपकारी ३८.

प्र० धनामध्यें उत्तम धन कोणतें ? उ० विद्याधन ३९.

प्र० लाभामध्यें उत्तम लाभ कोणता ? उ० अरोग्य ४०.

प्र० सुखामध्यें थोर सुख कोणतें ? उ० संतोष ४१.

प्र० या लोकीं उत्कृष्ट धर्म कोणता ? उ० भूतदया ४२.

प्र० काय सोडिल्यानें शोक पावत नाहीं ? उ० मान ४३.

प्र० मैत्री उणी होत नाहीं कोणाशीं ? उ० साधूशीं ४४.

प्र० काय सोडिल्यानें प्रिय होतो ? उ० मान ४५.

प्र० काय सोडिल्यानें शोक करीत नाहीं ? उ० क्रोध ४६.

प्र० काय सोडिल्यानें संपत्तिवान् होतो ? उ० इच्छा ४७.

प्र० याचकांस कशासाठीं द्यावें ? उ० पुण्यप्राप्तिसाठीं ४८.

प्र० नटनर्तकांस कशासाठीं द्यावें ? उ० लौकिकासाठीं ४९.

प्र० सेवकांस कशासाठीं द्यावें ? उ० त्यांचा संसार चालावा यासाठीं ५०.

प्र० राजास कशासाठीं द्यावें ? उ० आपलें भय दवडायासाठीं ५१

प्र० लोकवेष्टिला आहे कशानें ? उ० अज्ञानानें ५२.

प्र० प्रकाश वेष्टिला आहे कशानें ? उ० आंधारानें ५३.

प्र० मित्र सोडितो कशानें ? उ० लोभानें ५४.

प्र० स्वर्गी जात नाहीं कशानें ? उ० दुःसंगानें ५५.

प्र० जीवंत असून मेला असा पुरुष कोण ? उ० दरिद्री ५६.

प्र० सर्वांस पूज्य कोण ? उ० गुरु ५७.

प्र० विष कोणतें ? उ० याचना ५८.

प्र० तप कोणतें ? उ० स्वधर्माचरण ५९.

प्र० दम कोणता ? उ० मन स्वाधीन ठेवणें ६०.

प्र० क्षमा कोणती ? उ० हिताहित साहणें ६१.

प्र० लज्जा कोणती ? उ० नकरायाचें तें करणें ६२.

प्र० ज्ञान कोणतें ? उ० सारासार जाणणें ६३.

प्र० शम कोणता ? उ० चित्तांत शांति धरणें ६४.

प्र० दया कोणती ? उ० सर्वांस सुख इच्छिणें ६५.

प्र० आर्जव कोणतें ? उ० सर्वांवर समान चित्त ६६.

प्र० पुरुषांस दुर्जिक्य शत्रु कोणता ? उ० क्रोध ६७.

प्र० अतिशय व्याधी कोणती ? उ० लोभ ६८.

प्र० साधु कोणता ? उ० प्राणिमात्रांचा हितकर्त्ता तो ६९.

प्र० असाधु कोण ? उ० निर्दय ७०.

प्र० मोह कोणता ? उ० धर्म नकळे तो ७१.

प्र० मान कोणता ? उ० आपणच थोर मानणें ७२.

प्र० आळस कोणता ? उ० स्वहित नपहाणें ७३.

प्र० शोक करायास योग्य काय ?

उ० अज्ञान ७४.

प्र० स्थैर्य कोणतें ? उ० स्वधर्मीं स्थिरता ७५.

प्र० धैर्य कोणतें ? उ० इंद्रियें स्वाधीन करणें ७६.

प्र० स्नान कोणतें ? उ० मनाचा मळ घालवणें ७७.

प्र० ज्ञानी कोण ? उ० ज्याची समदृष्टि झाली तो ७८.

प्र० पंडित कोण ? उ० स्वधर्म जाणून तसें आचरण करितो तो ७९.

प्र० नास्तिक कोण ? उ० मूर्ख ८०.

प्र० मूर्ख कोण ? उ० वृथाभिलाषी ८१.

प्र० काम कोणता ? उ० संसारीं वासना ८२.

प्र० मत्सर कोणता ? उ० दुसऱ्याचें बरें पाहून वाईट वाटणें ८३.

प्र० अहंकार कोणाचेठायीं राहातो ? उ० अज्ञानाचे ठायीं ८४.

प्र० दंभ कोणता उ० सुकृत प्रगट करणें ८५.

प्र० पैशून्य कोणतें ? उ० दुसऱ्याचें छिद्र काढणें ८६.

प्र० अक्षय नरक कोणत्या कर्मानें होतो ? उ० याचकानें मागितलें असतां देतों असें ह्मणून मग देत नाहीं त्याकर्मानें ८७.

प्र० ब्राह्मणाचे अंगीं ब्राह्मणत्व कशानें होतें ? उ० सदाचरणानें ८८.

प्र० प्रियवचन बोलणारा काय लाभतो ? उ० प्रीति ८९.

प्र० विचार पूर्वक कार्य करितो तो काय लाभतो ? उ० जय ९०.

प्र० बहुत मित्र करितो तो काय लाभतो ? उ० सुख ९१.

प्र० स्वधर्मी तत्पर तो काय लाभतो ? उ० उत्तम गति ९२.

प्र० सुखी कोण ? उ० ऋणीनसून प्रवासीनसून आपले घरीं मिळेल ती भाजी भाकर खातो तो ९३.

प्र० आश्चर्य कोणतें ? उ० प्रतिदिवसीं माणसें मरतात तीं प्रत्यक्ष पाहत असतां आपण अमर आहों असें लोक मानितात हें ९४.

प्र० मार्ग कोणता ? उ० थोरथोर ज्या वाटेने गेले तो ९५.

प्र० वर्तमान कोणतें ? उ० काळ जो तो सूर्यास अग्नि कल्पून रात्रिदिवस हीं लांकडें, मास ऋतू हीं पळी, इणें प्राणिमात्रास महामोहरूप कढईंत ढवळून नित्य शिजवितो आहे हें वर्तमान ९६.

यक्षप्रश्न समाप्त.

॥ श्री ॥

# नारदनीति.

## प्रारंभः

सर्वबंधूंसहवर्तमान धर्मराजा, मयासुरानें निर्माण करून दिलेल्या सभेंत बसला असतां, नारदऋषि हातांत विणा घेऊन भगवंताचे गुणानुवादांचें गायन करीत करीत अकस्मात् धर्माच्या सभेंत आला; नंतर राजानें अर्घ्यपाद्यादिकांनीं नारदाची पूजा करून हात जोडून नम्रतेनें युक्त होत्सातां कुशल प्रश्न करून स्तब्ध राहिला; याप्रमाणें राजाची पूजा आदरपूर्वक ग्रहण करून परम संतुष्ट होत्सातां राजाच्या कल्याणार्थ उद्युक्त होऊन नारद बोलतो.

हे धर्मराजा तूं धर्मरूपी असून तुझ्या प्रजाही तशा-

च धर्मशील आहेत. परंतु नामाप्रमाणें स्वच्छ तुझी करणी आहेना ?

तुला राज्यादिक ऐश्वर्य प्राप्त झाल्यावर तुझें मन धर्ममार्गाच्याठायीं प्रवर्तलें आहे कीं ?

या सर्व राष्ट्रांत मी राजा आहें असा दुष्ट अभिमान तुला व्यापीत नाहींना ?

जो धर्म वडिलोपार्जित चालत आला त्याप्रमाणें अखंडित चालवितोस कीं नाहीं ?

शास्त्रबोधित कर्मांचा न केल्यानें जो दोष तो तुला लागत नाहींना ?

स्वधर्मानें अर्थ संपादन, अर्थानें धर्म संपादन या क्रमानें निरंतर करीत असतां नारायणाच्याठायीं मनोभावानें प्रेम ठेवितोसना ?

अधर्मोत्पादक ( अधर्मातें उत्पन्न करणारा ) नव्हे असा जो काम त्याचाच स्वीकार केला आहेसना ?

मूळचीं चंचल इंद्रियें कामाच्या संयोगानें तुला भ्रमिष्ट करून टाकीत नाहींतना ?

नित्य व नैमित्तिक अशीं दोन प्रकारचीं कर्मे आ-

वश्यक करण्यास सांगितलीं आहेत हें जाणून निरंतर करितोसना ?

कर्मांचा निषेध केल्याचें वर्म, फलाची इच्छा न ठेवणें हें तुझ्या ध्यानांत आहेना ?

यत्नानें किंवा यत्नावांचून साहजिक दैववशात् प्राप्त जाहलेल्या सर्व संपत्ति यथाविभागानें सर्वांसहवर्तमान भोगितोसना ?

अदृष्ट ह्म० दैव प्रतिकूळ किंवा अनुकूळ जाहल्या अंतीं निष्फळ भासमान जो धर्म, त्यापासून तुझी बुद्धि चंचलित जाहल्यामुळें तूं धर्माचरण करण्यास आळस करीत नाहींसना ?

रात्रंदिवस ( कालमानानें साठ घटिकांचा जो काळ तो ) लोटीत असतां, पाप पुण्य किती जोडिलें याविषयीं प्रतिक्षणीं मनांत विचार करितोसना ?

सर्वकाळ प्रभूचें नामस्मरण करीत असतां देहांतीं उत्तम लोकप्राप्ति खचीत आहे असें समजूस आपल्या कल्याणाविषयीं तुझा उद्योग आहेना ?

मोक्षधामाचे द्वारपाळ साधु आहेत असें जाणून

त्याचें सेवन करीत आहेसना ? जे ज्ञान दृष्टीनें अज्ञानांधास उत्तम मार्गीं लावितात.

श्रम ( लोक लज्जा ), संतोष, विवेक, साधुसंग. यांचा परम आदरानें स्वीकार करून आहेस कीं नाहीं ?

काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर, हे साहा रिपु आहेत याकरितां यांचा परित्याग, सर्वथा केला पाहिजे, त्याची रीती; काम, परस्त्रीशीं; क्रोध, सत्पुरुषाशीं; लोभ, स्वशरीराच्याठायीं; मोह, पुत्राचा; मद, सुल्हदांशीं; मत्सर सर्व प्राणिमात्रांचेठायीं याप्रमाणें परित्यागाची कल्पना तुला ठाऊक आहे कीं नाहीं ?

वरील शत्रूंचा समयविशेषीं स्वीकारही केला पाहिजे, तो येणेप्रमाणें. काम, ईश्वरभजनीं; क्रोध, इंद्रियदमनीं; लोभ, तीर्थाटणाविषयीं; मोह, साधुजनांचा; मद, दुर्जनांविषयीं; मत्सर, प्रपंचांत; अशा रीतीनें यांचा स्वीकार जाणतोसना ?

षड्विध राजचिन्हें, सत्य, बलाबलाचें लक्षण, ह्याचें तुला यथार्थ ज्ञान आहे कीं नाहीं ?

आज्ञा, कीर्ति, द्विजपालन, दान, भोग, मित्रलक्षण या सहा गुणांहींकरून सुशोभित असे तुझे प्रधान आहेतना ?

नानाप्रकारच्या व्यूहरचनेंत परम चतुर असून अल्प सेना असली तरी बहुत सेनेचा पराभव करणारे असे तुझे सेनापति आहेतना ?

परम विश्वासू असून निर्लोभी व उत्तम कुळांतील जन्मलेले, स्वामिकार्याकरितां प्रसंगास जीवही देणारे असे तुझे सेवक आहेत किंवा कसें ?

वेतनातिरिक्त ( वेतनापेक्षां निराळें ) राजद्रव्य ग्रहण करण्यास अगदीं अयोग्य आहे असा दृढ निश्चय करून स्वत्वकार्यीं वागणारे असे इमानी खरेखरे गृहस्थ तुझा संग्रहीं आहेतना ?

उत्तम, मध्यम कनिष्ठ कार्यांवर योग्यायोग्य पाहून योजणें, तद्विपरीत, प्रधानकार्यावर दासीपुत्र, हलक्या कामावर उत्तम, भाषण करण्यासही योग्य नव्हे अशाची सत्कारपूर्वक पूजा; सत्पात्रभूताची अवगणना,

अशा रीतीचे अयोग्य विचार तुझ्या हातून घडत नाहींतना ?

मोठें काम ज्याणें बजाविलें त्यास त्याच्या वेतनापेक्षां अधिक द्रव्य बक्षिसा दाखल देतोसना ?

तुझ्या हिताकरितां ज्यांनीं प्रसंगवशात् प्राणही दिले त्यांच्या स्त्रीपुत्रादिक कुटुंबाचें रक्षण स्वकीयाप्रमाणें करितोसना ?

पूर्वावस्थेंतले गरीबगुरीब जे आपले मित्र ते आतां तुला भेटले असतां त्यांस द्रव्य आदिकरून जें पाहिजे तें देऊन संतुष्ट करतोसना ?

दुसऱ्याचे गुण, व चित्तांतील अभिप्राय, यांचें ज्ञान, हीं मुख्य राजलक्षणें तुझाठायीं आहेतना ?

आपले प्रधान, सर्व राष्ट्रांत कीर्ति मिळवितात किंवा अपकीर्ति, याचा शोध दूतद्वारा तूं ठेवितोस किंवा नाहीं ?

सर्व प्रजा राजद्रव्य यथाविभाग देऊन, आज्ञेचें उल्लंघन नकरितां, भूमिसेवन ( शेतभात पिकविणें ) यथायोग्य करितातना ?

तीर्थयात्रा करणाऱ्या लोकांस मार्गीं लुटणारे जे चोरादिक त्याचें पारिपत्य करून मार्ग सुगम चांगले करितोस कीं नाहीं.

आपल्या सर्व देशीं चौकशी ठेऊन चोरांचा बंदोबस्त चांगला राहण्याकरितां त्यांस चांगली शिक्षा करितोस किंवा कसें ?

दीन मनुष्य आपलें दुःख सांगण्याकरितां आले तर त्यांस तुझ्या दरबारीं प्रतिबंध नाहींना ?

तुझें सैन्य परचक्राच्या नाशार्थ जेव्हां जातें त्यावेळेस लोकांना हाणामारी, लुटालूट करीत नाहींतना ?

आपल्या शरीरावर मुंग्या लागल्या असतां जसें हातानीं त्या त्या ठिकाणीं त्यांचें निवारण करितों त्याप्रमाणें लोकांचें संरक्षण दुष्टांपासून तूं करतोसना ?

सद्गुरूकरितां आपलें शरीर, द्रव्य, मनोभाव, हीं अर्पण करून आदरानें सेवाधर्मसंपादन करणारे असे शिष्य तुझ्या राज्यांत आहेतना ?

केवल निर्धन श्रोत्रिय ( वेदशास्त्रसंपन्न ) क्षीणवृत्ति ( ज्याची जीविका चालत नाहीं ) असा सात्विक साधु,

या उभयतांचें दैन्य हरण करून उत्तम रीतीनें पालन करितोसना ?

गरीब ब्राह्मणाची कन्या दारिद्र्यामुळें विवाहास योग्य असतां तशीच राहिली, तर त्याला द्रव्य देऊन विवाह कार्यास साह्य करितोसना ?

जे आपल्या कर्मानुसार कृतीमुळें तुझ्या कारागृहांत ( बंदांत ) पडले त्यांस रोगादिकानीं पीडीत केलें असतां वैद्यापासून औषध देऊन त्यांचा सांभाळ नीट करितोस कीं नाहीं ?

परम क्षुधित आलेले अतिथि, तुझ्या गृहीं पक्कान्नें भक्षण करून आशिर्वाद देऊन जात असतात कीं नाहीं ?

उत्तम असून कुलीन, अशा गृहस्थानें प्रसंगवशात् धनलुब्ध व हलकट सावकारापासून ऋण काढल्यावर त्याची फेड गरीबीमुळें होईना, तेव्हां लोकलज्जेमुळें त्याला देहत्याग करण्याचें संकट पडलें तर मोठ्या साक्षेपानें ऋणमुक्त करीत असतोसना ?

श्रीमंतांच्या स्त्रियांस जसें आपलें मूल गुणी, आवडी-

चें, त्याप्रमाणें याचकांस आर्तबुद्धीनें मानीत असतो-सना ?

तुझे ऋत्विज वेदशास्त्रवेत्ते, अचारसंपन्न, उत्तमोत्तम असे असून यज्ञयागादिक कर्मै यथासांग करितात, त्याकाळीं तुझ्या अज्ञानानें त्या कर्मांत व्यंगता घडत नाहींना ?

वाजपेयादिक, पुंडरीक, अनेकक्रतु, तुझ्या पुर्थें यथासांग क्रियायुक्त होऊन आज्याच्या आहुतींनीं यज्ञपुरुष सर्वकाळ तृप्त होत आहेना ?

अखंड पुत्रपौत्रादि वंशपरंपरा पावेतों उपभोग करावा या हेतूनें दिलेलें जें क्षेत्र त्याची वहिवाट करणारे ब्राह्मण, स्वधर्मीं तत्पर असून आनंदयुक्त आहेतना ?

नवग्रहांतील ग्रह तत्तत्कालीं विपरीत आले असतां त्यांच्या शांत्यर्थ त्रिकाळज्ञानी, शुभसूचक असे ज्योतिषी तुझ्या संग्रहीं आहेतना ?

तुझ्या भांडारीं ( जामदारखान्यावर) कारकून, निर्लोभी असून निरपेक्ष; पाकशाळेंत आचारी आप्त असून स्वच्छ व तृप्त ( खादाड नव्हत ), शरीरानें बळकट असे आहेत कीं नाहींत ?

विषम देशीं युद्धप्रसंगास योद्धे अविचारी, अन्य दुर्घट ठिकाणीं स्थिरबुद्धि, धैर्यवान् असे तुझ्या एथें आहेतना ?

समयोचित भाषणकुशल असून परमचतुर शिष्टसंमत अशा मनुष्यांतें संधिकार्याकरितां मोठ्या शत्रूंकडे योजितोसना ?

तुझ्या सभेमध्यें अति सन्निहित मोठमोठे विद्वज्जन, परमज्ञानी असून आचारसंपन्न आणि शिष्टसंमत असे बसत असतात काय ?

दुर्जन, शीघ्रकोपी ( तात्कालिक ज्याला राग येतो तो ), कठोर भाषण करणारा, परम संतापी, शून्यवादी ( उगाच निष्कारण वाद करणारा ), महापापी अशा मनुष्यांस सभेंत येण्याचा अगदीं प्रतिबंध ठेविला आहेसना ?

संत साधूंचा अपमान करणारा, देव द्विजांस दुष्ट अपशब्द बोलणारा, अशा अपराध्याचा तात्कालिक जिव्हाच्छेद करितोसना ?

तूं रात्रीच्या अपरभागीं ब्रा० पाहाटेस उठून सारा-

सारविचार, नीति, मोक्षमार्ग, भयनिवृत्ति यांविषयीं निरंतर विचार करीत असतोसना ?

नरक ( यातना भोगण्याचा लोक ), मोक्ष, पाप, यांचें स्वरूपसहित तुला ज्ञान, लोकनिंदा घडत नाहीं असें आहेना ?

अजेय शत्रूंस जिंकून जे जिंकिले त्यांचा प्रतिपाल, शरणागताचें संरक्षण, या रीतीनें सर्व करितोसना ?

भूमिकिल्ले आणि डोंगरकिल्ले यांत प्रतिवर्षीं जुन्या धान्याचा पालट करून नवीनाचा संग्रह, यंत्रादिक सामग्री, औषधें, उदक, यांचा संग्रह, उत्तम रीतीनें ठेवितोसना ?

ठिकठिकाणीं तोडमोड जाहली असतां तात्कालिक नीट बरोबर करणारे सुतार आदिकरून कर्मकुशल वेतनदार तुझ्याजवळ आहेतना ?

मठ, विहिरी, देवालयें, धर्मशाळा, यांचा जीर्णोद्धार करणें; अखंडित दीप, अखंडित पूजा, व नैवेद्य हे चालवितोस कीं नाहीं ?

मोठ्या प्रचंड पावसाच्या योगानें अतिपीडित जा

हलेल्या गाई आदिकरून पशु, अत्यंत कर्दमयुक्त गोठणें ( गायवाडे), असल्या पर्जन्यांत अव्यवस्थेनें बिघडलेलीं शालीक्षेत्रें ( भातशेती) अशीं तुझ्या राष्ट्रांत नाहींतना ?

दीन, दुर्बळ, अनाथ असे वृद्ध, बाल व दरिद्री; हे क्षुधार्त असल्यानें अत्यंत पीडित होऊन वर्षाकाळीं ( पावसाळ्यांत ), खराब रस्त्यांतून उदर निर्वाहाकरितां धांवत नाहींतना ?

आप्त सुहृज्जनांस त्रास, साधूंस क्लेश, याप्रमाणें दुर्जनदोष तुला लागत नाहींतना ?

तुझे उपाध्याय, प्रधान, कोणी मोठा गृहस्थ राजदर्शनास आला असतां आपलें महत्त्व कमी होईल म्हणून विघ्न करीत नाहींतना ?

तूं पर्वकाळीं (द्वादशी, पौर्णिमा, अमावास्या, वैधृति, व्यतीपात, याकाळीं ), स्त्रीसंग, सूर्योदय काळीं निद्रा पंक्तींत बसून एकाकीं मिष्टान्नभक्षण याप्रमाणें दुराचरणें करीत नाहींसना ?

चारी वर्णीं यथाविहित विद्यांचा अभ्यास पुत्रांकडून आर्तपणें करविण्याची तुझी चाल आहेना ?

हे पृथ्वीपते राजा तुझ्या राष्ट्रांत उग्र कामी, मित्रधन हरण करणारा आणि भर्तृत्याग करणारी स्त्री, अशीं मनुष्यें नाहींतना ?

ज्या रीतीनें याजक ( यज्ञकर्ते, ) पतिताचा परित्याग करितात व सर्व जातिकुळें, भ्रष्टाचा परित्याग करितात. त्याप्रमाणें सर्व प्रजा तुझा परित्याग तिरस्कारपूर्वक करीत नाहींतना ?

सहस्रावधिही मूर्खांचा त्याग करून, एखादा पंडित अनुभवशील तुझ्या संग्रहांत आहेना ?

एका मूर्खाच्या समागमानें, कीर्ति, लाभ, सुख, संपत्ति, यांचा सर्वथा नाश होऊन दुर्लौकिकाची मात्र प्राप्ति होते हे ठाऊक आहेना ?

तूं आणि प्रधान, गुप्त मसलत करीत असतां ती षट्करणीं होऊन चोहोंकडे पसरत नाहींना !

दुष्टबुद्धि, अतिबलवान् असून आपल्या आज्ञा न मानणारे असे जे शत्रु, त्यांविषयीं केलेली मसलत फुटल्यामुळें मोठ्या अनर्थाची प्राप्ति खचीत होते हें तुझ्या ध्यानांत आहे कां नाहीं ?

शत्रूंचें वर्तन (चाल चलणुक) कशी आहे याविषयीं क्षणोक्षणीं वर्तमान समजण्याकरितां दूत ठेविण्याचा विचार केला आहेसना ?

सर्वसाधारण जें असेल तें उघड बोलून गुप्त असेल तें मनांत ठेवावें, तसाच मोठा चतुर असल्यास वास्तविक खरेंच असेल तें युक्तीनें बोलावें, या युक्ति तुझ्या ध्यानांत आहेत कीं नाहींत ?

तुझ्या समक्ष मोठा आर्तपणा दाखवून सर्व मजकूर शत्रूंस कळविणारे असे कोणी असतील त्यांस जाणून आहेसना ?

जे वार्तिक ( बातमी पोंहचविणारे ) ते अज्ञात ( एकमेकाचा शोध एकमेकास नाहीं, ) असे राहण्याकरितां त्यांपाशीं तूं तशा रीतीनें वागून त्यांची रवानगी त्यात्या काळीं करितोसना ?

बहुत लाभ खरा परंतु स्वहिताचा नाश ज्यांत होतो अशा रीतीच्या लाभाविषयीं तुझा उद्योग नाहींना ?

आपल्या राज्याचें संरक्षण योद्ध्यांच्या बळानें होणार हें जाणून सैन्याचें वेतन वेळच्यावेळीं देत जा; त्या

योगानें ते एकचित्त राहून आपलें कार्य उत्तम रीतीनें करितील, हें जाणतोसना ?

प्रति महिन्यास वेतन न दिलें तर त्यांस खर्चाची मोठी निकड होऊन फार दुःख पावतील, अशा कारणानें समयास मोठा अनर्थही घडेल हें जाणतोसना ?

सर्व उत्पन्न पाहून पैकीं चतुर्थांश करभार घ्यावा, हें न करितां सर्वस्व हरण करण्याची दुष्ट खोड-तुझी नाहींना ?

सर्व राज्याचा जमाखर्च राखणार तुझे अधिकारी, कागद पत्र तयार केलेले हातांत घेऊन प्रथमप्रहरीं तुझ्या उभयभागीं दाखविण्याविषयीं उद्युक्त राहतातना?

तूं सभेंत येऊन सिंहासनीं बसतोस त्यावेळीं, राजदर्शनास आलेल्या लोकांस पुष्पाद्यलंकारशोभित, सुप्रसन्नमुख असे पाहतोसना ?

तुझ्या उभयभागीं रक्तांबरी ( तांबडा पोशाग केलेले, ) खड्गधारी ( तरवारी हातांत घेणारे, ) कवच कुंडलादिक वीरालंकारमंडित असे क्षत्रियांचे समूह असतात कीं नाहीं ?

उत्तम सत्पात्रभूताला दान करण्याच्या प्रसंगीं, उत्कृष्ट गुणिजनांस बक्षीस देण्याच्या वेळेस, मध्यें विघ्न करणारे असे तुझे प्रधान व पुरोहित नाहींतना ?

राजनगर रक्षण करण्याकरितां जवळच्या ग्रामांचीं शहरें करावीं आणि खेडीं, घोष ( गवळ्यांची वस्ती जेथें असते तो ), यांचे ग्राम करावे, यांतील अभिप्राय जाणतोसना ?

घाट, खिंडी, बेटें, या ठिकाणीं नानाप्रकारच्या उपद्रवामुळें रस्ते बंद असतात तेथें सरकारी चौक्या राखून मार्ग सुगम ( जाण्यास चांगले ) करीत असतोस कीं नाहीं ?

पर्जन्यापासून जें उदक भूमीवर पडून, सर्व नद्या, तलाव, पाट, यांस परिपूर्ण करितें, त्या उदकाची उपेक्षा कधींही करूं नये; कारण त्याच्या योगानें सर्व जंगम स्थावर प्राण्यांचें संरक्षण होतें. तर असें होण्याकरितां ते जलाशय भंगरहित सर्वकाळ तूं आपल्या राष्ट्रांत ठेवितोसना ?

परमलोभी असून चोरकर्मांत निपुण असे अध-

कारी व राजस्त्रिया, राजकन्या, हीं प्रजांना विनाकारण पीडित नाहींतना ?

जो दुष्टबुद्धीनें एकाएकीं घात करण्यास प्रवृत्त जाहला, अशा आततायी पुरुषाचें तुला वर्तमान समजतांक्षणीं, विशेष विचार न करितां त्याचा वध तात्कालिक करवितोस कीं नाहीं ?

उत्तम व भल्या गृहस्थापासून केवळ पोटाच्या निर्वाहाकरितां चोरी जाहली असतां, आपल्या दूतांपासून त्याची मुक्तता करून सत्कारपूर्वक त्याच्या घरीं त्याला पोहंचवितोस कीं नाहीं ?

जे साधुसंत लोकहितार्थ तुला बुद्धिवाद सांगणारे त्यांना नम्रतेनें सत्कारपूर्वक वंदून त्यांच्या आज्ञेचा स्वीकार करीत असतोसना ?

ज्योतिषी आदिकरून सर्व शास्त्री, गुरु, देवांच्या मूर्ति, यज्ञमंडप आदिकरून सर्व पवित्र स्थलें, हीं तुझा दृष्टीस पडतांच तत्कालीं सत्कार पुरःसर वंदन करितोस कीं नाहीं ?

आपलें कल्याण व्हावें या हेतूनें सभेंत विद्वज्जनांचा स्तव उत्तम प्रकारचा करून गौरवितोसना ?

हे बलवंता राजा, अग्नि, चोर सर्प व्याघ्रादिक, दुष्ट, जंतु, रोग, राक्षस, परचक्र, यांपासून आपल्या राष्ट्राचें संरक्षण करीत असतोसना ?

आंधळे, मुके, पांगळे, बधिर, व्यंग ( हस्तादिक सर्व अवयवानीं युक्त नव्हे तो ), आतुर ( रोग ग्रस्त होऊन मरणोन्मुख जाहलेला ), संन्यासी आदिकरून सर्व विरक्त, यांचें परिपालन उत्तम रीतीनें करतोसना ?

सत्पुरुषाचें अदर्शन, अनर्थकारक जे दुष्टविषय त्यांचें चिंतन, सर्वकाळ द्रव्याचीच आशा, गुप्त मसलतीचें अरक्षण हीं तूं करीत नाहींसना ?

नानाप्रकारच्या वस्तु घेऊन तुला भेटी देण्याकरितां आलेले जे कोणी गृहस्थ त्यांचा मनोगत सर्व कार्यभाग विचारपूर्वक करून देऊन दिलेल्या वस्तूंच्या चौपट त्यांचा लाभ तूं करून देतोसना ?

साधूंचीं चिन्हें दाखवून, जे शिश्नोदर परायण (केवळ पोट भरून स्त्री लंपट जाहलेले ), त्यांजविषयीं तुझें मन विश्वासत नाहींना ?

तुझ्या राज्यांत, मातृपितृवर्गाचा सर्वथा अनादर

करून, श्वशुर वर्गाचा सन्मानपूर्वक स्वीकार करणारा असा मूर्ख नाहींना ?

तुझ्या देशांत सुना सासूंस छळितात, पुत्र पित्यास शिष्य गुरूस, चाकर धन्यास, याप्रमाणें अनर्थकारक रीति नाहींतना ?

रोग, अग्नि, शत्रु, हे अगदीं लहान असले तरीं त्यांची उपेक्षा न करितां तत्काळीं त्यांची शांति केरीत असावें कारण हे क्षणमात्रानें वृद्धिंगत होऊन सर्वस्वापहार करण्यास चुकणार नाहींत हें कळतेंना ?

सर्व राजनीति जी सांगितली आहे त्याप्रमाणें जाणून तुझ्या अंगीं अनुभव आहेना ?

राजा याप्रमाणें उत्तम गुण तुझ्याठायीं खचीत असावे या हेतूनें तुला मी हे सर्व प्रश्न केले तस्मात् हे धर्मा ! सावधान चित्त असून विचारपूर्वक वर्तावें ह्मणजे तेणें करून इहलोकीं कीर्तिलाभ होऊन देहांतीं उत्तम लोकप्राप्ति होते; याप्रमाणें नारद ऋषीचें वाक्य ऐकून धर्मराजा परम आनंदयुक्त होऊन बोलता जाहला, महाराज आपण महाभागवतोत्तम अहांत आपल्या पुढें

त्या सेवकानें काय बोलावें. याप्रमाणें ही नारदनीति सभापर्वांत सांगितली आहे. ज्याला राज्याची इच्छा असेल त्याणें ही नीति मनापासून वाचून ध्यानांत ठेवावी ह्मणजे त्याच्या सर्व चिंता नष्ट होऊन चक्रवर्तित्व ह्म० सकल भूमंडलाचें स्वामित्व त्याला प्राप्त होतें.

इति नारदनितिः समाप्ता